दैनिक
www.epaper.rajyaloktantra.com
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–८३ | शनिवार दि.१३ जून २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### लोकशाहीचा आत्मा आणि निष्पक्षतेचा प्रश्न

जगातील सर्वात मोठी लोकशाही म्हणून भारताची ओळख आहे. या लोकशाहीची खरी ताकद केवळ निवडणुकांमध्ये नसून त्या निवडणुका पार पाडणाऱ्या संस्थांच्या निष्पक्षतेत आहे. निवडणूक आयोग, न्यायव्यवस्था आणि घटनात्मक संस्था यांच्यावरील जनतेचा विश्वास हा लोकशाहीचा पाया असतो. मात्र गेल्या काही वर्षांत या संस्थांच्या कार्यपद्धतीबाबत वारंवार प्रश्न उपस्थित होत असल्याचे दिसत आहे.

# ४० लाखांपेक्षा जास्त शेतकऱ्यांना विनाअट कर्जमाफी

## फडणवीस यांची घोषणा, आजवर शेतकऱ्यांना केलेल्या विविध मदतीची दिली माहिती

**मुंबई । प्रतिनिधी**

**शेतकरी कर्जमाफी योजनेचा लाभ देण्यासंदर्भात काही अटी ठेवल्या असून, याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महत्त्वाचा खुलासा केला आहे. आम्ही कर्जमाफी योजनेमध्ये एकच अट टाकलेली आहे. ती विशेषतः महाराष्ट्रातील बँकिंग यंत्रणा आणि जिल्हा सहकारी बँका टिकल्या पाहिजेत. याकरिता अट टाकलेली आहे. त्यामध्ये ज्यांना वारंवार कर्जमाफी मिळालेली आहे; त्यांना यावेळीही कर्जमाफी देणार आहोत. पण एका ठराविक रकमेपर्यंत त्यांना माफी देऊ आणि उरलेले पैसे त्यांना भरावे लागतील. पण साधारणपणे ४० लाखांपेक्षा जास्त शेतकऱ्यांना विनाअट कर्जमाफीचा फायदा मिळेल, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले.**

कर्जमाफीतील अट ही बँकिंग यंत्रणा टिकण्यासाठी आहे; अन्यथा बँकिंग यंत्रणा पूर्णपणे उद्ध्वस्त होईल, असेही ते म्हणाले. ते मुंबईत शुक्रवारी (दि.१२) मोदी सरकारची १२ वर्ष विश्वासाची, विकासाची, जन–कल्याणाची याची माहिती देताना बोलत होते. आम्ही कर्जमाफीसंदर्भात एक उपसमिती तयार केली आहे. त्या समितीत मी आणि दोन उपमुख्यमंत्री आहेत. ही कर्जमाफी जशी पुढे जाईल. तशा त्यातील अडचणी लक्षात येतील. त्या अडचणी सोडवण्याची जबाबदारी या समितीकडे देण्यात आलेली आहे. त्या अडचणी आम्ही सोडवू. पण कुठल्याही निवडणुका

▶▶ पान २ वर



### ● मोदी सरकारने स्वामिनाथन अहवाल लागू केला

मोदी सरकारने हमीभावासंदर्भातील एम. एस. स्वामीनाथन यांचा अहवाल लागू केल्याचा दावा मुख्यमंत्री फडणवीस यांनी केला. २००४ साली एम. एस. स्वामिनाथन यांनी अहवाल दिला. २००४ पासून २०१४ पर्यंत यूपीए सरकारने स्वामिनाथन अहवाल लागू केला नाही. मोदींचे सरकार २०१६ साली सत्तेत आल्यानंतर स्वामिनाथन अहवाल लागू करून त्याप्रमाणे हमीभाव देण्याचा निर्णय घेतला. त्यावरही काही लोकांनी विरोध केल्यानंतर स्वतः स्वामिनाथन यांनी लेख लिहून मी दिलेला अहवाल १० वर्षे प्रलंबित होता. तो मोदी यांनी लागू केला, हे स्पष्ट केले. शेतमालाच्या हभीभावासंदर्भात मोठे निर्णय मोदी यांनी घेतल्याचे त्यांनी म्हटले.

### “ चाऱ्याची टंचाई निर्माण होणार

*चाऱ्याची टंचाई निर्माण होऊ शकते. त्यादृष्टीने पशुसंवर्धन विभाग आणि कृषी विभाग यांना सूचना देऊन वैरण विकासाचा कार्यक्रम हाती घेतला आहे. जेणेकरुन आपल्याकडे चारा उपलब्ध असेल. पण ज्या पद्धतीने संकेत मिळत आहेत; त्यानुसार त्यात मोठी अडचण येऊ शकते. पाऊस कमी पडणार आहे. त्यातून आम्ही मार्ग काढू, असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला.*

### “ ....तर दुबार पेरणीचे संकट

*विशेषतः शेतकऱ्यांना आम्ही सातत्याने सल्ला (ॲडव्हाजरी) देत आहोत. राज्य सरकारच्या सल्ल्यावर आधारितच जर शेतकऱ्यांनी पेरणी केली तर दुबार पेरणीची वेळ येणार नाही. नेहमीच्या पद्धतीने पेरणी केली तर पावसाच्याअभावी पेरण्या वाया जातील आणि यामुळे दुबार पेरणीची वेळ येईल. आतापर्यंत शेतकऱ्यांनी संयम ठेवला आहे. त्याचप्रमाणे शेतकऱ्यांनी राज्य सरकाकडून येणाऱ्या सल्ल्याकडे लक्ष द्यावे, असे आवाहन त्यांनी केले आहे. कृषी विद्यापीठे आणि राज्य सरकारची कृषी विभागाची यंत्रणा आहे. ही यंत्रणा जो काही सल्ला देईल त्यानुसारच शेतकऱ्यांनी पेरण्या कराव्यात. एसएमएसद्वारे आणि महाविस्तार ॲपवर आम्ही सगळी माहिती देत असल्याचे त्यांनी सांगितले.*

### पीएम किसान योजना: शेतकऱ्यांना ४.३ लाख कोटी

सिंचनाचे विशेष पॅकेज देऊन केंद्र सरकारच्या मदतीने मागील दहा वर्षात १०० पेक्षा अधिक प्रकल्प आम्ही पूर्ण केले असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पंतप्रधान मोदी यांनी गरिबी आणि तीव्र गरिबीतून २५ कोटी लोकांना बाहेर काढण्याचे काम केले. संयुक्त राष्ट्रसंघानेदेखील हा दशकातील चमत्कार असल्याचा या घटनेचा उल्लेख केला. ८१ कोटी नागरिकांना अन्नसुरक्षा दिली. ११ कोटीपेक्षा जास्त शेततकऱ्यांना किसान सन्मान योजनेच्या माध्यमातून ४.३ लाख कोटी रुपये देण्याचे काम पंतप्रधान मोदी यांनी केल्याचे फडणवीसांनी सांगितले.

## थोडक्यात...

### लातूरच्या त्या शेतकऱ्याला आता नवीन बैल मिळणार

लातूरः वीज पडून बैल दगावल्याने शेतकरी पत्नी जू खांद्यावर घेऊन औत ओढत असल्याचा व्हिडिओ समोर आला होता. लातूरमधील या घटनेची दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भूमिहीन शेतकरी काशिनाथ गायकवाड यांना जिल्हाधिकाऱ्यांमार्फत तातडीने मदत देऊ केली. त्यांना एक बैल आणि दगावलेल्या बैलाच्या नुकसानभरपाईची रक्कम दिली. पण सदर बैल दोनच दिवसांतच शेतात औत ओढत असताना खाली बसला. तो बैल आजारी असल्याचे स्पष्ट झाले. यामुळे त्या शेतकऱ्यांची अडचण काही दूर झाली नाही. आता यावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी, त्या शेतकऱ्याला बाजारात नेऊन त्यांच्या पसंतीचा बैल त्यांना घेऊन देण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत.

### पेट्रोल–डिझेल खरेदीवर केंद्र सरकारची मर्यादा

मुंबईः देशातील काही भागांत पेट्रोल–डिझेलच्या असामान्य खरेदीमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने ''मोटर स्पिरिट आणि हाय स्पीड डिझेल (किरकोळ विक्री केंद्रांमार्फत पुरवठ्याचे तात्पुरते नियमन) आदेश जारी केला आहे. पेट्रोल पंपावर एका वाहनाला जास्तीत जास्त २०० लिटर डिझेल मिळणार आहे. हा आदेश राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आला असून तो तत्काळ लागू झाला आहे. आदेश म्हटले आहे, पेट्रोल (मोटर स्पिरिट) आणि डिझेल (हाय स्पीड डिझेल) या अत्यावश्यक वस्तू असून मालवाहतूक, प्रवासी वाहतूक, शेतीची कामे, आपत्कालीन सेवा, राष्ट्रीय सुरक्षा आणि अर्थव्यवस्थेच्या सुरळीत कामकाजासाठी त्यांचा अखंड पुरवठा आवश्यक आहे.

### खरात प्रकरणात निकम यांची नियुक्ती

मुंबईः अंधश्रद्धा, तंत्र–मंत्राच्या नावाखाली महिलांचे लैंगिक शोषण केल्याप्रकरणी अटकेत असलेल्या भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणात मोठी घडामोड समोर आली आहे. राज्यभरात खळबळ उडवून देणाऱ्या या प्रकरणात सरकारची बाजू भक्कमपणे मांडण्यासाठी राज्य शासनाने ज्येष्ठ वकील ॲड. उज्ज्वल निकम यांची नियुक्ती केली आहे. अशोक खरात याच्याविरोधात अनेक महिलांनी गंभीर स्वरूपाच्या तक्रारी दाखल केल्यानंतर नाशिक पोलिसांनी त्याला अटक केली होती. या प्रकरणाचा तपास विशेष तपास पथकाकडे सोपवण्यात आला असून तपासादरम्यान पोलिसांच्या हाती अनेक धक्कादायक पुरावे लागल्याचा दावा करण्यात आला आहे. खरातच्या कार्यालय आणि फार्म हाऊसवर झालेल्या कारवाईत महिलांचे शोषण केल्याचे कथित १०० हून अधिक अश्लील व्हीडीओ सापडल्याची माहिती तपास यंत्रणांनी दिली आहे. खरातविरोधात लैंगिक अत्याचार, फसवणूक तसेच महाराष्ट्र नरबळी आणि जादूटोणा प्रतिबंधक कायद्यान्वये विविध गंभीर गुन्हे दाखल आहेत.

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती,**
बीड, दि.१२ जून २०२६
आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १५२.५० क्विंटल | २,१८० | २,३८५ | २,२७३ |
| ज्वारी/हायब्रिड: २२६.५० क्विंटल | २,००० | ४,९०० | २,९७३ |
| मका/लोकल: २.५० क्विंटल | २,०३० | २,०३० | २,०३० |
| तूर : ०.५० क्विंटल | ७,३०० | ७,३०० | ७,३०० |
| उडीद : १.०० क्विंटल | ४,७०० | ४,७०० | ४,७०० |
| बाजरी: ५२.०० क्विंटल | १,८०० | २,४८० | २,३१६ |
| मुग: २.०० क्विंटल | ६,७०० | ६,७०० | ६,७०० |
| सोयाबीन:१.५० क्विंटल | ६,७०० | ६,७०० | ६,७०० |
| हरभरा: ५.०० क्विंटल | ४,१०० | ५,५०० | ५,०६८ |

# पवारांचे पंढरपुरात अन्नत्याग आंदोलन

### सरसकट कर्जमाफी जाहीर होईपर्यंत करणार आंदोलन

**पंढरपूर । प्रतिनिधी**



शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी राष्ट्रवादीचे आमदार रोहित पवार यांनी 'अन्नदात्यासाठी अन्नत्याग' आंदोलन पंढरपुरात सुरू केले. सरकारने जाचक अटी रद्द करून सरसकट कर्जमाफी जाहीर करावी. जोपर्यंत सरकार जाहीर करत नाही, तोपर्यंत आंदोलन सुरू राहील, असा इशारा आमदार रोहित पवार यांनी दिला.

राष्ट्रवादीचे आमदार रोहित पवार हे सरकारच्या कर्जमाफी आणि विविध प्रश्नांवर रस्त्यावर उतरले आहेत. 'अन्नादात्यासाठी अन्नत्याग' आंदोलनाला पंढरपुरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे शुक्रवारी सुरुवात केली.

▶▶ पान २ वर

# बंदी असलेल्या पदार्थांच्या धंद्यात असलेल्यांना आता थेट मकोका

## एफडीए आयुक्त तुकाराम मुंढेंचा निर्णय, उत्पादक ते विक्रेते अशा संपूर्ण साखळीवर कठोर कारवाई

**मुंबई । प्रतिनिधी**

अन्न व औषध प्रशासन (एफडीए) विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर राज्यभरात भेसळ आणि प्रतिबंधित अन्नपदार्थांविरोधातील कारवाईला वेग आला असून, आता गुटखा व निकोटीनयुक्त पानमसाल्याच्या संघटित रॅकेटविरोधात थेट महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा (मकोका)



लागू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

▶▶ पान २ वर

### स्वत:च्याच मेडिकलमधून औषधं खरेदी करण्याचा हट्ट कराल तर याद राखा

रुग्णालयांमध्ये दाखल असलेल्या रुग्णांना औषधे आणि वैद्यकीय साहित्य रुग्णालयाच्याच आत असणाऱ्या अधिकृत फार्मसीमधून (मेडिकल) खरेदी करण्याची सक्ती करणाऱ्या रुग्णालयांना अन्न व औषध प्रशासन विभागाने मोठा दणका दिला आहे. रुग्णालयातील फार्मसीमधूनच औषध खरेदी करणे कायद्याने बंधनकारक नाही. औषधे कुठून खरेदी करायची, हा सर्वस्वी रुग्ण आणि त्यांच्या नातेवाइकांचा अधिकार आहे, असा महत्त्वपूर्ण आदेश एफडीए आयुक्त तुकाराम मुंढे यांनी जारी केला आहे. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या रुग्णालयांवर कडक कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशाराही त्यांनी पत्रकार परिषदेत दिला.

# कोट्यावधीची वाळू चोरी : जिल्हाधिकाऱ्यांनी तहसीलदाराला झापले

## मालमत्तेवर ९० कोटी रुपयांचा बोजा टाकण्याचा निर्णय झाल्याची चर्चा

**बीड । गेवराई । प्रतिनिधी**

तालुक्यातील गोदावरी नदीमधून कोट्यावधी रुपयाचा वाळू उपसा केला गेला. विशेष म्हणजे घरकुल लाभार्थ्यांना शासन निर्णयानुसार देण्यात येणाऱ्या पाच ब्रास वाळूचा देखील भ्रष्टाचार गेवराई तहसील आणि महसूल प्रशासनातील कर्मचाऱ्यांनी केल्याचे आता स्पष्ट झाले आहे. शुक्रवारी जिल्हाधिकारी कार्यालयात गेवराईचे तहसीलदार यांची समोरासमोर सुनावणी घेण्यात आली. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी तहसीलदारांना चांगलेच झोपले असल्याची चर्चा आहे. तर यामध्ये तहसीलदार आणि महसूल मंडळातील काही अधिकारी कर्मचारी दोषी असल्याचे प्रथमदर्शनी दिसून आल्यानंतर जवळपास ९० कोटी रुपयांचा बोजा या सर्वांच्या मालमत्तेवर टाकला जाणार असल्याची विश्वसनीय सूत्रांकडून माहिती आहे.

▶▶ पान २ वर

### “ आमदार पंडितांचे कौतुक



गेवराई तालुक्यातील वाळूपट्ट्यावर नेहमी पंडितांचे राज्य असते, अशी चर्चा गेवराई आणि जिल्ह्यामध्ये होते. मात्र या सर्व चर्चांना बाजूला सारत आमदार विजयसिंह पंडित यांनी थेट स्पॉट पंचनामा केला. घरकुल लाभार्थ्यांना वाळू दिली जात नाही, ती वाळू माफियांच्या घशात घातली जाते. याला तहसीलदार आणि संबंधित कर्मचारी कारणीभूत आहेत. या संदर्भातील सविस्तर तक्रार त्यांनी केल्यानंतर प्रशासन खडबडून जागे झाले. विशेष म्हणजे आ. पंडित यांनी केलेल्या या तक्रारी आणि कारवाईमुळे सर्वसामान्य जनतेमधून मात्र त्यांचे कौतुक होत आहे.

## जालना जिल्ह्यात वाळूमाफीयावर कारवाई

# १ कोटीचा मुद्देमाल जप्त



**जालना । प्रतिनिधी**

कारवाईअवैध वाळू व खनिज वाहतुकीविरोधी विशेष मोहीम जालना जिल्हा पोलीस प्रशासनाने वाळू माफिया वर मोठी कारवाई केली . जिल्ह्यातील अवैध वाळू उपसा आणि वाहतुकीविरोधात पोलीस प्रशासनाने कंबर कसली असून, गेल्या २४ तासांत विविध पोलीस ठाण्यांच्या हद्दीत मोठी कारवाई करण्यात आली आहे. चंदनझिरा, घनसावंगी, मंठा आणि अंबड पोलीस ठाण्यांतर्गत करण्यात आलेल्या या धडक कारवाईत

▶▶ पान २ वर

# २१ जून रोजी होणाऱ्या निट परिक्षेच्या नियमांत महत्वपुर्ण बदल

## परीक्षेची वेळ वाढवली, रफ वर्कसाठीच्या जागेतही वाढ, विद्यार्थ्यांचा ताण कमी करण्यासाठी 'एनटीए' चा मोठा निर्णय




**पुणे । प्रतिनिधी**

**वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी अत्यंत महत्त्वाची मानली जाणारी 'नीट' प्रवेश परीक्षा यंदा २१ जून २०२६ रोजी आयोजित करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर, राष्ट्रीय परीक्षा एजन्सीने (एनटीए) विद्यार्थ्यांचे हित आणि त्यांचा ताण कमी करण्याच्या उद्देशाने काही महत्त्वपूर्ण आणि विद्यार्थी–अनुकूल बदल जाहीर केले आहेत. एनटीएने शुक्रवारी, १२ जून २०२६ रोजी एक अधिकृत परिपत्रक जारी करून या सुधारणांची माहिती दिली.**


यावर्षी सर्वात गाजलेली व वादग्रस्त ठरलेली एकमेव परीक्षा म्हणजे नीट होय. वैद्यकीय अभ्यासक्रमांची ही प्रवेश परीक्षा केंद्रासाठी परीक्षा घेणारी ठरली. कोक्रोच जनता पार्टीने तर या विषयावर रान उठविले. हा धडाका देशभर चर्चेत आला. मात्र या परीक्षेबाबत गंभीर असणाऱ्या केंद्र शासनाने ठोस पाऊल टाकण्याचा मानस ठेवलाच होता. त्याचा अखेर अंमल झाला आहे. या नव्या बदलांनुसार, विद्यार्थ्यांचा प्रत्यक्ष परीक्षेचा वेळ प्रशासकीय सोपस्कारांमुळे वाया जाऊ नये, यासाठी परीक्षेचा कालावधी वाढवून १९५ मिनिटे करण्यात आला आहे. आता ही परीक्षा दुपारी २:०० ते संध्याकाळी ५:१५ या वेळेत पार पडेल. हजेरीपटावर स्वाक्षऱ्या करणे, ओळख पटवणे आणि इतर पर्यवेक्षकीय प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी लागणारा वेळ लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे विद्यार्थ्यांना मुख्य प्रश्नपत्रिका सोडवण्यासाठी पूर्ण वेळ मिळेल आणि प्रशासकीय कामांमुळे वेळ कमी पडल्याची भावना त्यांच्या मनात निर्माण होणार नाही. परीक्षार्थींसाठी दुसरा मोठा बदल म्हणजे प्रश्नपत्रिकेत रफ वर्क (कच्च्या कामासाठी) मिळणाऱ्या जागेत करण्यात आलेली वाढ होय. भौतिकशास्त्र आणि रसायनशास्त्रातील क्लिष्ट गणिते व आकृत्या सोडवण्यासाठी आधी केवळ २ पाने दिली जात असत. मात्र, विद्यार्थ्यांच्या फीडबॅकचा विचार करून आता रफ वर्कसाठी

▶▶ पान २ वर

छत्रपती संभाजी नगर (धुत हॉस्पिटल) येथील सुप्रसिध्द डॉक्टर
आता आपल्या बीडमध्ये उपलब्ध
डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे
एम.बी.बी.एस., एम.डी.,
मानसोपचार तज्ञ ( Gold Medalist)
न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट
मो.9518551503 / 9545615352



महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात
सकाळी : १०.०० ते दुपारी २.०० वा.
साई (गवते) कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड, डॉक्टर लाईन, बस स्टॅण्डच्या पाठीमागे,बीड
दुपारी २.३० ते ६.०० वा. डॉ.विश्वास जोशी यांच्या दवाखान्या समोर
प्रगती होमिओ क्लिनिक धोंडीपुरा, टिळक रोड,बीड
खालील आजारांचे निदान व उपचार
● डोकेदुखी / अती चिंता व काळजी
➡ (सतत टेन्शन, घाबरटपणा,घाम सुटणे, थरकाप सुटणे, हाता–पायात मुंग्या येणे)
● झोपेच्या समस्या
➡ (झोप न येणे, झोपेत चालणे, बडबड करणे, चक्कर येणे, दातखिळी बसणे)
● व्यसनाधिनता : (दारु, तंबाखू, गुटखा, धुम्रपान)
● बालकांच्या समस्या :
➡ (झोपेत लघवी करणे, हट्टीपणा, चिडचीडेपणा, अभ्यासात कमी)
● स्मृती भंग (विसरभोळेपणा)
● लैंगिक समस्या
➡ (लवकर वीर्य पतन होणे,सेक्सची इच्छा न होणे,कमजोरी,स्वप्नदोष)
● स्क्रिझोफ्रेनिया व इतर मानसिक समस्या



नोंदणी व अधिक माहितीसाठी संपर्क
मो. 8237353737 / 8182839922
सौ.संध्या श्रीराम टेकाळे(शिंदे)
मुख्याध्यापिका मो.९४२१३४८४७४
श्रीराम टेकाळे
(पुर्व गट शिक्षणाधिकारी, पाटोदा/शिरुर/बीड)
सामाजिक कार्यकर्ते मो.9075387638
सौ.डॉ.जयश्री रोहन मालुरे(टेकाळे)
M.B.B.S. मो.७७४३९९०९८८
विठाई हॉस्पिटल,कळंब
डॉ.रोहन मालुरे
M.B.B.S.,MD,Medicine
विठाई हॉस्पिटल,कळंब मो.९८६०५६०५५७

## अग्रलेख

# लोकशाहीचा आत्मा आणि निष्पक्षतेचा प्रश्न

जगातील सर्वात मोठी लोकशाही म्हणून भारताची ओळख आहे. या लोकशाहीची खरी ताकद केवळ निवडणुकांमध्ये नसून त्या निवडणुका पार पाडणाऱ्या संस्थांच्या निष्पक्षतेत आहे. निवडणूक आयोग, न्यायव्यवस्था आणि घटनात्मक संस्था यांच्यावरील जनतेचा विश्वास हा लोकशाहीचा पाया असतो. मात्र गेल्या काही वर्षांत या संस्थांच्या कार्यपद्धतीबाबत वारंवार प्रश्न उपस्थित होत असल्याचे दिसत आहे. मध्य प्रदेशातील राज्यसभा निवडणुकीत काँग्रेसच्या नेत्या मीनाक्षी नटराजन यांचा उमेदवारी अर्ज रद्द झाल्यानंतर पुन्हा एकदा हा वाद ऐरणीवर आला आहे. सर्वोच्च न्यायालयाने त्यांची याचिका फेटाळल्यानंतर कायदेशीर प्रक्रिया संपुष्टात आली असली, तरी या प्रकरणातून निर्माण झालेले प्रश्न मात्र कायम आहेत. एका उमेदवाराला अर्जातील त्रुटी दुरुस्त करण्याची संधी दिली जाते आणि दुसऱ्याला तीच संधी मिळत नाही, अशी भावना निर्माण झाली तर निवडणूक प्रक्रियेच्या निष्पक्षतेबाबत संशय निर्माण होणे स्वाभाविक आहे.

लोकशाहीत न्याय मिळणे जितके महत्त्वाचे असते, तितकेच तो न्याय मिळताना दिसणेही महत्त्वाचे असते. हीच बाब सध्या अनेक प्रकरणांमध्ये अधोरेखित होताना दिसते. स्मृती इराणी यांच्या शैक्षणिक पात्रतेबाबत विविध निवडणूक शपथपत्रांमध्ये दिसलेले बदल असोत, किंवा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वैवाहिक स्थिती व शैक्षणिक पात्रतेबाबत उपस्थित झालेले प्रश्न असोत, या सर्व प्रकरणांमध्ये निवडणूक आयोगाने पुरेशी सक्रिय भूमिका घेतली नाही, असा आरोप विरोधकांकडून सातत्याने केला जात आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीदरम्यान प्रचारातील काही वक्तव्यांवरूनही आयोगाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले. काही नेत्यांना केवळ नोटिसा देण्यात आल्या, तर इतरांवर कठोर कारवाई करण्यात आली. त्यामुळे कारवाईचे निकष समान आहेत का, हा प्रश्न निर्माण झाला. लोकशाहीतील कोणतीही संस्था निष्पक्ष असल्याचा दावा केवळ कायदेशीर अधिकारांवर टिकत नाही; तर तिच्या निर्णयांतील सातत्य, पारदर्शकता आणि समान वागणूक यांवर तो अवलंबून असतो. इलेक्टोरल बाँड प्रकरणानेही या चर्चेला अधिक धार दिली. निवडणूक आयोगाने सुरुवातीला व्यक्त केलेल्या आक्षेपांनंतर घेतलेली मवाळ भूमिका आणि त्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने त्या योजनेला असंवैधानिक ठरवलेला निर्णय यामुळे आयोगाच्या स्वायत्ततेविषयी नवे प्रश्न निर्माण झाले. ईव्हीएम, व्हीव्हीपॅट, मतदार यादीतील नावे वगळण्याचे आरोप आणि निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेबाबतचे वाद यामुळेही संशयाचे वातावरण अधिक गडद झाले आहे.

विशेष चिंतेची बाब म्हणजे माजी निवडणूक आयुक्त आणि घटनात्मक पदांवर काम केलेल्या अनेक वरिष्ठ व्यक्तींनीही सार्वजनिकरीत्या आयोगाच्या कार्यपद्धतीबद्दल चिंता व्यक्त केली आहे. सर्वोच्च न्यायालयाने मुख्य निवडणूक आयुक्तांच्या नियुक्ती प्रक्रियेत सुधारणांची गरज व्यक्त केली होती, हे देखील या चर्चेचे गांभीर्य अधोरेखित करते.

निश्चितच, विरोधकांनी केलेला प्रत्येक आरोप सत्यच असेल असे नाही. अनेक आरोप राजकीय हेतूंनी प्रेरित असू शकतात. परंतु लोकशाहीत प्रश्न विचारण्याचा अधिकार आणि संस्थांनी त्या प्रश्नांना विश्वासार्ह उत्तर देण्याची जबाबदारी यांचे महत्त्व तितकेच मोठे आहे. आरोप खरे की खोटे, हे चौकशी आणि पुराव्यांवरून ठरेल; परंतु संशय निर्माण होईल अशी परिस्थिती निर्माण होऊ नये, याची काळजी घटनात्मक संस्थांनी घेणे आवश्यक आहे.

लोकशाही केवळ मतदानपेटीत जिवंत राहत नाही. ती निष्पक्ष निवडणूक आयोग, स्वतंत्र न्यायव्यवस्था आणि विश्वासार्ह तपास यंत्रणांवर आधारलेली असते. जेव्हा या संस्थांबाबत जनमानसात शंका निर्माण होऊ लागते, तेव्हा लोकशाहीचा आत्माच कमकुवत होऊ लागतो. त्यामुळे आज गरज आहे ती कोणत्याही पक्षाच्या समर्थनाची किंवा विरोधाची नाही; तर लोकशाही संस्थांवरील विश्वास अधिक दृढ करण्याची आहे. कारण अखेरीस लोकशाहीचे यश हे निवडणुकीच्या निकालात नसते, तर त्या निकालामागील प्रक्रियेवर जनतेचा असलेल्या विश्वासात असते.

# मतदान केंद्रनिहाय बी.एल.ए. नियुक्त करा

## शिवसेना नेते अंबादास दानवे यांची शिवसेना पदाधिकाऱ्यांना सूचना

**बीड । प्रतिनिधी**

**शिवसेना नेते तथा राज्याचे माजी विधान परिषद विरोधी पक्षनेते आमदार अंबादास दानवे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना – उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या बीड जिल्ह्यातील पदाधिकारी व शिवसैनिकांची महत्त्वपूर्ण आढावा बैठक आज संपन्न झाली. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था, पदवीधर मतदारसंघ तसेच इतर निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर संघटनात्मक तयारीचा सविस्तर आढावा यावेळी घेण्यात आला.**





बैठकीत बी.एल.ए. नियुक्तीचा आढावा, स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील तयारी, पदवीधर मतदारसंघातील संघटनात्मक स्थिती व नियोजन, तसेच स्थानिक पातळीवरील पक्ष संघटनेच्या कामकाजाचा आढावा घेण्यात आला. प्रत्येक तालुका व जिल्हास्तरीय पदाधिकाऱ्यांकडून कामकाजाचा अहवाल जाणून घेत आगामी काळातील संघटनात्मक बांधणीसंदर्भात आवश्यक सूचना करण्यात आल्या. आगामी निवडणुकांच्या दृष्टीने पक्ष संघटना अधिक सक्षम करण्यावर भर देत बूथस्तरापर्यंत पक्षाचे जाळे मजबूत करण्याचे निर्देश दिले. शिवसैनिकांनी जनतेच्या प्रश्नांशी जोडले जाऊन पक्षाची भूमिका प्रभावीपणे लोकांपर्यंत पोहोचवावी तसेच प्रत्येक निवडणुकीसाठी सज्ज राहावे, असे आवाहन अंबादास दानवे यांनी केले. याप्रसंगी संपर्कप्रमुख परशुराम जाधव, पदवीधर समन्वयक दिलीप घुगे, जिल्हाप्रमुख गणेश वरेकर, उल्हास गिराम सह माजी जिल्हाप्रमुख रत्नाकर शिंदे, परमेश्वर सातपुते, कुंडलिक खांडे, जिल्हा संघटक नितीन धांडे तसेच महिला आघाडी जिल्हा संघटक मीरा नवले यांची प्रमुख उपस्थिती होती. यांच्या सोबतच सर्व उपजिल्हा प्रमुख, सर्व तालुक्यांचे तालुकाप्रमुख तथा आजी–माजी पदाधिकारी सह बहुसंख्येने शिवसैनिक उपस्थित होते.

# १४ वर्षीय मुलीचे अपहरण करून बालविवाह केल्याने आरोपीस तीन वर्षे सक्तमजुरी



**जालना । प्रतिनिधी**

**चौदा वर्षीय अल्पवयीन मुलीला फूस लावून पळवून नेऊन तिच्याशी बालविवाह करणाऱ्या आरोपीस जालना येथील विशेष जिल्हा व सत्र न्यायालयाने तीन वर्षे सक्तमजुरी व १५ हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली आहे.**

न्यायाधीश कुरेश विजय मोरे यांनी आरोपी रविंद्र परमेश्वर तारू, वय २०, रा. भारज खुर्द, ता. जाफ्राबाद यास पोक्सो कायदा, भा.दं.वि. कलम ३६३ व बालविवाह प्रतिबंधक कायद्यान्वये दोषी ठरवले. दिनांक २३ फेब्रुवारी २०२५ रोजी आरोपीने पीडित मुलीच्या आई शेतात कामाला गेल्याची संधी साधून तिला मोटारसायकलवरून पळवून नेले होते. त्यानंतर छत्रपती संभाजीनगर, वेरूळ, पुणे, संभाजीनगर येथे नेऊन तिच्याशी बळजबरीने विवाह केला. दि. ३१ मार्च २०२५ रोजी पीडिता जाफ्राबाद पोलीस ठाण्यात हजर झाली. विशेष सरकारी वकील वर्षा मुळीक यांनी सरकार पक्षातर्फे काम पाहिले. एकूण ७ साक्षीदार तपासण्यात आले. दंडाची रक्कम पीडितेला देण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. याप्रकरणात कोर्ट पैरवी टीमने विशेष मदत केली.



**जालना: जिल्ह्यातील प्रतिष्ठित नागरिक, उद्योगपती व समाजसेवक तसेच कालिका स्टीलचे संचालक श्री घनश्याम सेठ गोयल यांची अखिल भारतीय अग्रवाल संमेलनच्या राष्ट्रीय उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल शिवसेना उपनेते तथा आमदार अर्जुनराव खोतकर यांना भेट देऊन शाल, पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार करून त्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी सुनील सेठ गोयल, गोपाल सेठ गोयल, डॉ. सुभाष अजमेरा, मेघराज चौधरी यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांनी श्री घनश्याम सेठ गोयल यांच्या निवडीबद्दल आनंद व्यक्त करत त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.**

# परळीतील तौहीद पठाण हत्या प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई करा

## खा.बजरंग सोनवणे यांची मागणी, पीडित कुटुंबाची भेट घेऊन व्यक्त केल्या तीव्र भावना



**परळी । प्रतिनिधी**

**परळीत गुंडगिरी वाढतच असून तौहिद पठाण हत्या प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी केली आहे.**

येथील युवक तोहीद पठाण याची काही दिवसांपूर्वी झालेली निर्घृण हत्या अत्यंत दुर्दैवी, संतापजनक आणि मन हेलावून टाकणारी आहे. या भीषण घटनेमुळे संपूर्ण परळी परिसरासह जिल्ह्यात मोठी हळहळ व्यक्त होत असून, पठाण कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. या पार्श्वभूमीवर, बीडचे खा.बजरंग सोनवणे यांनी आज पीडित कुटुंबाच्या निवासस्थानी जाऊन त्यांची भेट घेतली आणि संपूर्ण कुटुंबियांचे सांत्वन केले. या कठीण प्रसंगी आम्ही पठाण कुटुंबाच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत, अशी ग्वाही देत खासदार सोनवणे यांनी या प्रकरणातील दोषींवर अत्यंत कठोर आणि तातडीने कारवाई करण्याची मागणी प्रशासनाकडे केली आहे. खा.बजरंग सोनवणे यांनी पठाण यांच्या निवासस्थानी भेट देऊन कुटुंबियांच्या भावना जाणून घेतल्या व त्यांना धीर देण्याचा प्रयत्न केला. कमावता आणि तरुण मुलगा गमावल्यामुळे पठाण कुटुंबियांना झालेल्या वेदना पाहून उपस्थित सर्वांचेच डोळे पाणावले होते. या भेटीनंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना खासदार सोनवणे म्हणाले, तोहीदची हत्या ही केवळ एका तरुणाची हत्या नसून कायदा व सुव्यवस्थेला आव्हान देणारी घटना आहे. अशा कठीण प्रसंगी पठाण कुटुंबाला धीर देणे हे आपले कर्तव्य आहे. पीडित कुटुंबाला न्याय मिळेपर्यंत आमचा लढा सुरूच राहील. या नराधमांना कायद्याचा कठोर हिसका दाखवणे गरजेचे आहे.

## पान १ वरून...

### ४० लाखांपेक्षा जास्त शेतकऱ्यांना

समोर नसताना, आम्ही कर्जमाफी केली आहे. ही गोष्ट फार महत्त्वाची आहे. विरोधी पक्षाने कोणतीही ताकदीने मागणी न करता शासनाने स्वतः केलेली ही कर्जमाफी आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. यामुळे आमच्या डोळ्यासमोर राजकीय हेतू नाही. आपल्या शेतकऱ्याला कसे सक्षम करता येईल. अन्यथा २०२९ ची निवडणूक असताना, डिसेंबर २०२८ मध्ये कर्जमाफी करता आली असती. पण आम्ही तसे केलेले नाही. असे फडणवीस यांनी नमूद केले. मॉन्सूनवर एल निनोचे सावट आहे. या पार्श्वभूमीवर बोलताना मुख्यमंत्र्यांनी, याची आम्ही तयारी करत असल्याचे सांगितले. मी अर्थसंकल्पीय भाषणात याबाबत वाच्यता केली होती. एल निनोचा मोठा परिणाम आपल्या राज्यावर होईल. त्यामुळे त्याची तयारी आम्ही सुरु केली आहे. त्यासाठी टास्क फोर्स तयार केला. जलसंधारणाच्या कामावर भर दिला. कारण पाऊस कमी पडल्यानंतर मोठी धरणे कामी येत नाहीत. पाऊस कमी पडल्यानंतर जलसंधारणाच्या छोट्या संरचनाचा उपयोग होतो. प्रत्येक जिल्ह्याला उद्दिष्ट देऊन जलसंधारणाची कामे पूर्ण करण्याबाबत सांगण्यात आले आहे, असे ते म्हणाले.

----------

### बंदी असलेल्या पदार्थाच्या धंद्यात

उत्पादक, साठेबाजी, वाहतूकदार, वितरक आणि विक्रेते अशा संपूर्ण साखळीवर कठोर कारवाई केली जाणार असल्याचा इशारा त्यांनी दिला आहे. गेल्या महिनाभरात राज्यातील विविध ठिकाणी धाडी टाकून मोठ्या प्रमाणात भेसळीचा व प्रतिबंधित माल जप्त करण्यात आला आहे. संबंधितांवर गुन्हे दाखल करून अटकही करण्यात आली आहे. मात्र, या कारवायांनंतरही काही भागांत अवैध गुटखा, तंबाखू व निकोटीनयुक्त पानमसाल्याची विक्री सुरू असल्याचे निदर्शनास आल्याने आता आणखी कठोर पावले उचलण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पत्रकार परिषदेत बोलताना मुंढे म्हणाले की, गुटखा, तंबाखू किंवा निकोटीनयुक्त पानमसाला तसेच तत्सम प्रतिबंधित अन्नपदार्थांचे उत्पादन, साठवणूक, वाहतूक, वितरण आणि विक्री करणाऱ्या संघटित नेटवर्कविरोधात पात्र प्रकरणांमध्ये मकोका अंतर्गत कारवाई केली जाईल. मात्र, संबंधित आरोपींचा गुन्हेगारी इतिहास आणि कायदेशीर निकष तपासूनच मकोका लागू करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. याशिवाय, खाद्यपदार्थ वर्तमानपत्रात गुंडाळून विक्री करणाऱ्या विक्रेत्यांनाही सक्त ताकीद देण्यात आली असून अशा प्रकारांवरही एफडीएची विशेष नजर राहणार आहे. प्रतिबंधित पदार्थांच्या अवैध व्यवहारात काही विभागीय अधिकारी सहभागी असल्याचे आरोप होत असल्याच्या पार्श्वभूमीवर मुंढे यांनी स्पष्ट भूमिका मांडली. ''या आरोपांची चौकशी सुरू आहे. कोणताही अधिकारी दोषी आढळल्यास त्याच्यावरही कठोर कारवाई केली जाईल,'' असा इशारा त्यांनी दिला. पदभार स्वीकारल्यानंतर २५ मे ते ११ जून या कालावधीत प्रतिबंधात्मक कारवाईत सुमारे ३ कोटी २७ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणांमध्ये ३५ गुन्हे दाखल करण्यात आले असून ३५० जणांना अटक करण्यात आल्याची माहितीही मुंढे यांनी दिली. दरम्यान, आपल्याला कोणतीही धमकी मिळालेली नसल्याचे स्पष्ट करत मुंढे म्हणाले, ''सोशल मीडियावर फिरत असलेला धमकीचा व्हिडिओ जुना असून तो कदाचित पुण्यातील असावा. सध्या मला कोणतीही धमकी आलेली नाही.'' असे ते म्हणाले. दरम्यान, मकोकाअंतर्गत दोषी ठरल्यास किमान ५ वर्षांपासून जन्मठेपेपर्यंत शिक्षेची तरतूद आहे. जामीन मिळण्यासाठी कठोर अटी असून न्यायालयाकडून विशेष छाननी केली जाते. तपासासाठीही विशेष अधिकार आणि प्रक्रिया लागू असतात, त्यामुळे हा देशातील कठोर फौजदारी कायद्यांपैकी एक मानला जातो.

------------

### पवारांचे पंढरपुरात

सध्या विधान परिषदेची आचार संहिता आहे. या पार्श्वभूमीवर आमदार रोहित पवारांनी विचार करावा, असे पत्र जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांना दिले होते. पण त्या पत्राकडे दुर्लक्ष करीत आंदोलन नियोजित स्थळीच सुरू करण्यात आले. ज्या ठिकाणी आंदोलन करणार आहेत, तिथे कायदा व सुव्यवस्था, वाहतूक व्यवस्थेचे कारण देत शुक्रवारी सकाळी पोलीस प्रशासनाने आमदार पवार यांना नोटीस बजावली मात्र, पवार आंदोलनावर ठाम राहिले. या आंदोलनाला सुरुवात करण्याआधी संत नामदेव पायरी येथे जाऊन त्यांनी दर्शन घेतले. त्या ठिकाणी आरती केली. फडणवीस सरकारला सरसकट कर्ज माफी करण्याची बुद्धी दे, असे साकडे आमदार रोहित पवार यांनी घातले. त्या नंतर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला अभिवादन करून आंदोलनाच्या ठिकाणी हातात संविधान घेवून आमदार रोहित पवार दाखल झाले. या वेळी जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेस (श.प.) पक्षाचे आमदार राजू खरे, भाजपाच्या बैठकीला हजर राहिलेले, राष्ट्रवादीचे आमदार अभिजित पाटील यांच्यासह पदाधिकारी आणि काही शेतकरी उपस्थित होते.

------------

### कोट्यावधीची वाळू चोरी : जिल्हाधिकाऱ्यांनी

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी एका निर्णयाद्वारे राज्यातील घरकुलधारकांना पाच ब्रास वाळू देण्याचा निर्णय घेतला. त्याला मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. त्याची अंमलबजावणी राज्यभर सुरू असताना गेवराईचे तहसीलदार संदीप खोमणे व त्यांच्या सहकाऱ्यांनी वाळूमाफीयाशी संगणमत करून ही वाळू चढ्या भावाने विक्री केली. घरकुलधारकांना मात्र मोफतची पाच ब्रास वाळू मिळाली गेली नाही. जवळपास ३७४ घरकुलधारकापैकी बोटावर मोजण्या इतक्या घरकुलधारकांनाच वाळू मिळाली. यासंदर्भात आमदार विजयसिंह पंडित यांनी केलेल्या तक्रारीनंतर महसूल मंत्र्यांनी याची दखल घेत, जिल्हाधिकाऱ्यांना जाब विचारला. जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधितांना नोटीस पाठवून दोन दिवसात आपले म्हणणे मांडण्याचे सांगितले. शुक्रवारी तहसीलदार संदीप खोमणे यांची सुनावणी घेण्यात आली. दुपारी दोन वाजता तहसीलदार जिल्हाधिकारी कार्यालयात आले. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी तहसीलदारांना चांगलेच फैलावर घेतले होते. तुम्ही दिलेली आकडेवारी आणि वाळू उपसा यात तफावत आहे. विशेष म्हणजे अनेक घरकुल लाभार्थ्यांना वाळू मिळाली नाही, मग तुम्ही रेकॉर्डवर वाळू मिळाल्याचे दाखवता, हा काय प्रकार आहे. तुमच्या या अशा कामामुळे वरिष्ठ मला विचारणा करतात, असे म्हणत तहसीलदारांना चांगलेच झापले. यासोबतच यामध्ये संबंधित दोषी असवेतच कारण वाळू मोठ्या प्रमाणात लाभार्थ्यांना मिळालीच नाही. तेव्हा या वाळूच्या रकमेच्या पाचपट रक्कम अशी एकूण ९० कोटी रुपये संबंधितांच्या मालमत्तेवर बोजा म्हणून टाकला जाणार असल्याचेही सूत्राकडून समजते. प्रत्यक्षात आता नेमकी काय कारवाई होणार हे मात्र पहावे लागणार आहे.

--------------

### २१ जून रोजी होणाऱ्या निट परिक्षेच्या

२ ऐवजी ४ पाने उपलब्ध करून दिली जाणार आहेत, ज्यामुळे विद्यार्थ्यांना आकडेमोड करण्यासाठी पुरेशी जागा मिळेल. याशिवाय, प्रश्नपत्रिकेच्या रचनेतही एक अत्यंत संवेदनशील बदल करण्यात आला आहे. पूर्वी सर्व रफ पेजेस प्रश्नपत्रिकेच्या अगदी शेवटी असायची. यामुळे अनेक विद्यार्थ्यांना, विशेषतः डाव्या हाताने लिहिणाऱ्या उमेदवारांना वारंवार पाने उलटून गणिती आकडेमोड करणे गैरसोयीचे ठरत होते. हा त्रास दूर करण्यासाठी एनटीएने आता २ रफ पाने प्रश्नपत्रिकेच्या सुरुवातीला (मुख्य सूचनांच्या पायानंतर लगेच) आणि उर्वरित २ पाने प्रश्नपत्रिकेच्या शेवटी देण्याचा निर्णय घेतला आहे.

-------------

### १ कोटीचा मुद्देमाल जप्त

एकूण १ कोटी ११ लाख ८९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करून संबंधित१६ आरोपींवर गुन्हे दाखल केले. पोलीस ठाणे चंदनझीरा ११७,५०,०००/- (घनसावंगी) ₹२०,२५,०००/ अंबड १५,०४,०००/- मंठा १६३,१०,०००/- तालुका जालना १६,००,०००/- जालना जिल्ह्यात वाळू माफियांवर पोलिसांचा मोठा प्रहार; एकाच दिवसात १ कोटींहून अधिकचा मुद्देमाल जप्त वरून १६ जनाविरुद्ध कारवाई केली. वाळूचे वाहने ११ जप्त करण्यात आले. (१ टिप्पर १ ट्रॅक्टर विना क्र. ९ ट्रॅक्टर-ट्रॉली एकूण जप्त वाळू: ५१५ ब्रास वाळू जप्त करण्यात आली. सदरील कारवाई अप्पर पोलीस अधीक्षक विक्रम साळी यांनी स्वतः पोलीस पथक सोबत घेऊन कारवाई केली चंदनझीरा हद्दीमध्ये दोन ठिकाणी स्वतः समक्ष राहून १७ लाख ५० हजारांची धडक कारवाई चंदनझिरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतही पोलिसांनी वाळू चोरीविरुद्ध मोहीम राबवून १७,५०,०००/-रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. स्थानिक गुन्हे शाखा, जालना आणि घनसावंगी पोलिसांनी संयुक्त कारवाई करत भेंडाळा शिवारातून विनापरवाना वाळू वाहतूक करणारा भारत बेंझ कंपनीचा हायवा टिप्पर ( २१ ५४५५) पकडला. यामध्ये २० लाख रुपयांचा हायवा आणि २५ हजार रुपयांची वाळू असा एकूण २०,२५,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. अंबड पोलिसांची ठाणे: अंबड पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैधरित्या वाळू वाहतूक करणाऱ्या वाहनावर कारवाई करून सुमारे १५,०४,०००/- किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. मंठा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील खोरावड ता. मंठा शिवारातील पूर्णा नदीपात्रातून अवैध वाळूची वाहतूक करणाऱ्या ९ ट्रॅक्टर्सवर कारवाई करण्यात आली. दिनांक १२ जून रोजी पहाटे ३:०० वाजेच्या सुमारास ही कारवाई करण्यात आली. यामध्ये महिंद्रा, स्वराज आणि आयशर कंपनीचे एकूण ९ ट्रॅक्टर आणि ट्रॉलीसह अंदाजे ६३,१०,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी ११ आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तालुका पोलीस स्टेशन हद्दीमध्ये मा. अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी यांचे मार्गदर्शनात एका ठिकाणी १५० ब्रास बरास वाळू चोरी विरुद्ध मोहीम राबवून६,००,०००/- रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. सदरील कारवाई पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा पोलीस प्रशासनाने ही कारवाई केली.

------------

# जिल्ह्यात १० दिवसीय विशेष क्रीडा शिबिराचे आयोजन

**बीड । प्रतिनिधी**

**जिल्ह्यातील क्रीडा संस्कृतीचे संवर्धन करणे आणि राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर दर्जेदार कामगिरी करण्यासाठी खेळाडूंना तंत्रशुद्ध पद्धतीने प्रशिक्षण मिळावे, या उद्देशाने एका विशेष क्रीडा शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय आणि जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्र, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने सॉफ्टबॉल, बेसबॉल व मैदानी खेळांच्या प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर यांनी दिली.**

क्रीडा विषयक शिबिर दि.१६ ते २५ जून २०२६ या दहा दिवसांच्या कालावधीत जिल्हा क्रीडा संकुल, बीड येथे संपन्न होणार असून, खेळाडूंच्या सुविधेसाठी दररोज सकाळी ६ ते ९.३० आणि दुपारी ४.३० ते संध्याकाळी ७ अशा दोन सत्रांमध्ये हे प्रशिक्षण दिले जाईल. या शिबिराचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे मैदानी प्रशिक्षणासोबतच खेळाडूंच्या सर्वांगीण विकासासाठी विशेष समुपदेशन व चर्चासत्रांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये शिवछत्रपती पुरस्कारार्थी नं. पो. शेळके खेळाडूंना खेळाविषयी सखोल माहिती देतील, तर गुणवंत क्रीडा मार्गदर्शक अविनाश बारगजे हे क्रीडा क्षेत्रातील संधी व करिअर याविषयी मार्गदर्शन करणार आहेत. आंतरराष्ट्रीय खेळाडू श्रीमती राधा तांबे या योगसाधनेच्या माध्यमातून शारीरिक व मानसिक तंदुरुस्तीचे धडे देतील. तसेच, खेळातील दुखापतींवर मार्गदर्शनासाठी डॉ. कुलदीप शहाणे आणि योग्य आहाराविषयी माहिती देण्यासाठी आहारतज्ज्ञ डॉ. सूरज कोकणे उपस्थित राहणार असल्याने खेळाडूंना एकाच छताखाली दर्जेदार मार्गदर्शन लाभणार आहे. या शिबिरात सॉफ्टबॉलसाठी सतीश राठोड, बेसबॉलसाठी रेवननाथ शेलार आणि मैदानी खेळांसाठी अविनाश पाटील हे तज्ज्ञ क्रीडा मार्गदर्शक म्हणून खेळाडूंना तंत्रशुद्ध प्रशिक्षण देतील. शिबिरात नाव नोंदणीसाठी व अधिक माहितीसाठी खेळाडूंनी सतीश राठोड (९९२३०१९३५३), रेवननाथ शेलार (९०७५४७६७५१) किंवा अविनाश पाटील (९६२३७८११२१) यांच्याशी थेट संपर्क साधावा, जिल्ह्यातील जास्तीत जास्त खेळाडूंनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन क्रीडा विभागाने केले आहे.

## टी.सी.हरवला आहे

कु.गोंजारे साध्वी दिनकर या विद्यार्थिनीचा इयत्ता १२ वी पासचा टी. सी.(सन २०२५-२६) निमगाव-बीड एसटी प्रवासा दरम्यान हरवला आहे.ज्या कोणास सापडल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

**-::संपर्क::-**

**कु. गोंजारे साध्वी दिनकर, मो.९२८४०२९२९३**

दैनिक

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

शनिवार, दि. १३ जून २०२६



## थोडक्यात




### थकीत हमाली व महागाई निर्देशांकाच्या मागणीसाठी गोदाम हमालांचे बेमुदत कामबंद आंदोलन

माजलगाव । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील शासकीय धान्य गोदामांमध्ये कार्यरत हमालांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी ११ जून २०२६ पासून बेमुदत कामबंद आंदोलन सुरू करण्यात आले आहे. जानेवारी २०२६ ते मे २०२६ या पाच महिन्यांची थकीत हमाली तातडीने अदा करावी, तसेच २०१२ पासूनचा महागाई निर्देशांकाचा फरक उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार माथाडी मंडळाकडे वर्ग करण्यात यावा, या प्रमुख मागण्या आंदोलनकर्त्यांनी केल्या आहेत.

हमालांच्या म्हणण्यानुसार, माथाडी कायद्यानुसार दरमहा मजुरी व लेव्ही भरण्याचे बंधन असतानाही अनेक ठिकाणी त्याचे पालन करण्यात आलेले नाही. परिणामी गेल्या पाच महिन्यांपासून हमालांना मजुरी मिळालेली नसून त्यांच्यावर आर्थिक संकट ओढवले आहे. बीड जिल्ह्यासह सांगली, सातारा, नाशिक, बुलढाणा, सोलापूर व जळगाव जिल्ह्यातील काही भागांमध्येही अशीच परिस्थिती असल्याचे आंदोलनकर्त्यांनी निवेदनात नमूद केले आहे. पुरवठा विभागाच्या शासन निर्णयांनुसार हमालांना महागाई निर्देशांकाचा लाभ देणे बंधनकारक असतानाही बीड जिल्ह्यातील हमालांना अद्याप त्याचा लाभ मिळालेला नाही. याबाबत मा. उच्च न्यायालयाने आदेश दिलेले असतानाही त्याची अंमलबजावणी न झाल्याने हमालांमध्ये तीव्र नाराजी आहे. याशिवाय थेट वाहतूक धोरणांतर्गत संबंधित गोदामातील नोंदणीकृत हमालांकडूनच काम करून घेण्याचे बंधन वाहतूक कंत्राटदारांवर घालावे, तसेच माथाडी मंडळाने निश्चित केलेल्या अ-१ हमाली दरानुसार हमाली व लेव्ही भरणे बंधनकारक करावे, अशी मागणीही करण्यात आली आहे. माजलगाव शासकीय गोदामातील हमाल मुकादम वैजनाथ शिंदे, दशरथ शिंदे, विजय साळवे, पांडुरंग शिंदे, लक्ष्मण होके, राजेभाऊ वाघमारे, ज्योतीराम खामकर, देविदास होके, गोविंद होके व वैभव पारवे हे आंदोलनात सहभागी झाले असून हे आंदोलन राजकुमार घायाळ यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे

### पंतप्रधान मोदी यांच्या दीर्घायुष्यासाठी सिद्धेश्वर मंदिरात महाआरती संपन्न



माजलगाव । प्रतिनिधी

देव देश धर्मासाठी समर्पण निस्वार्थ भावनेने अविरतपणे सेवा कार्य करणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतीय लोकशाहीच्या इतिहासात लोकप्रिय पंतप्रधान म्हणून व जनादेशाचा नवा विक्रम प्रस्थापित केला असून पंतप्रधान म्हणून सर्वाधिक ४ हजार ३९९दिवसांचा यशस्वी कार्यकाळ पूर्ण केला आहे.त्यांचा हा यशस्वी कार्यकाळाचा आलेख असाच उत्तरोत्तर वाढत रहावा व त्यांना दीर्घायुष्य लाभावे म्हणून लोकनेत्या नामदार पंकजाताई मुंडे,माजी खासदार डॉक्टर प्रितम मुंडे, जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली दि १० जुन बुधवार रोजी माजलगाव येथील ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर मंदिरामध्ये पूजा व महाआरती संपन्न झाली.या धार्मिक कार्यक्रमाच्या प्रसंगी माजलगाव भारतीय जनता पार्टीचे शहर मंडळाचे तालुकाध्यक्ष विनायक रत्नपारखी म्हणाले की नरेंद्र मोदी यांचे अविरतपणे सेवा कार्य असेच चालू राहावे म्हणून श्री सिद्धेश्वर चरणी नतमस्तक होऊन नरेंद्र मोदी यांच्या हातून देशाची अविरतपने सेवा कार्य चालत राहो आणि त्यासाठी त्यांना उत्तम आरोग्य उदंड आयुष्य लाभावे म्हणून माजलगाव येथील ग्रामदैवत श्री सिद्धेश्वराच्या चरणी प्रार्थना करून मंगलमय उत्साह पूर्ण वातावरणात महापूजा व महाआरती करण्यात आली.

# चकलांबा आणि माजलगाव ग्रामीण भागातील घरफोडीचे गुन्हे उघडकीस

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातील घरफोडी आणि चोरीच्या गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी बीड स्थानिक गुन्हे शाखेने धडक मोहीम हाती घेतली आहे. या अंतर्गत चकलांबा आणि माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत झालेले दोन मोठे घरफोडीचे गुन्हे उघडकीस आणण्यात पोलिसांना यश आले असून, पुणे येथील तीन आरोपींसह एका विधी संघर्षग्रस्त बालकाला ताब्यात घेण्यात आले आहे.





**बीड स्थानिक गुन्हे शाखेची मोठी कारवाई**

काही दिवसांपूर्वी चकलांबा पोलीस ठाणे हद्दीतील गेवराई रोडवर असलेल्या 'सूरज बिअर बार अँड परमिट रूम' येथे अज्ञात चोरांनी हॉटेलची खिडकी तोडून आत प्रवेश केला होता. चोरट्यांनी विविध कंपन्यांच्या दारूच्या बाटल्या आणि गल्ल्यातील रोख रक्कम चोरून नेली होती. याप्रकरणी चकलांबा पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०५ आणि ३३१(४) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. स्थानिक गुन्हे शाखेने घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे तपास सुरू केला. दरम्यान, आरोपी चकलांबा रोडने गेवराईकडे येत असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी महार टाकळी परिसरात सापळा रचून तीन आरोपींना ताब्यात घेतले.

कार्तिक विरसिंग नागपुरे (रा. मुंढवा, पुणे)आदित्य मयूर जाधव (रा. मांजरी, पुणे)हर्षवर्धन मोहन रेड्डी (रा. केशवनगर, पुणे)प्राथमिक चौकशीत या तिघांनी आपल्या इतर साथीदारांच्या मदतीने हा गुन्हा केल्याची कबुली दिली आहे. पुढील कायदेशीर कारवाईसाठी या आरोपींना चकलांबा पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे.माजलगाव ग्रामीण भागातील घरफोडीचा पर्दाफाश; ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त दुसऱ्या एका कारवाईत, माजलगाव ग्रामीण पोलीस ठाणे हद्दीतील घरफोडीच्या गुन्ह्याचा (गु.र.नं. १५३/२०२६, कलम ३३१(४) भान्यास) तपास करत असताना, स्थानिक गुन्हे शाखेने तांत्रिक विश्लेषण आणि गुप्त माहितीच्या आधारे एका विधी संघर्षग्रस्त बालकाला ताब्यात घेतले. त्याच्याकडून चोरीस गेलेला ८०,५०० रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले आहे.यांच्या मार्गदर्शनाखाली झाली कारवाई:सदर यशस्वी कामगिरी बीडच्या पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके मॅडम, अपर पोलीस अधीक्षक श्री. समीर शेख सर आणि स्थानिक गुन्हे शाखेचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

माजलगाव ग्रामीण कारवाई: पोलीस उपनिरीक्षक महेश विघ्ने, पोलीस अंमलदार जोगदंड, पठाण, गित्ते, घोडके आणि मराडे.

चकलांबा कारवाई: पोलीस उपनिरीक्षक श्रीराम खटावकर, शेखर औटे, पोलीस अंमलदार राहुल शिंदे, आनंद मस्के, बबन सलगर, अशफाक सय्यद, अश्विनकुमार सुरवसे आणि सिद्धेश्वर मांजरे.

## दरोडा व गंभीर मारहाण प्रकरणात पाच आरोपींची निर्दोष मुक्तता

**ॲड. आदित्य राख यांचा प्रभावी युक्तिवाद; जिल्हा व सत्र न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निकाल**

बीड । प्रतिनिधी



दरोडा टाकून गंभीर मारहाण केल्याचा आरोप असलेल्या प्रकरणात जिल्हा व सत्र न्यायालयाने पाच आरोपींची निर्दोष मुक्तता करत महत्त्वपूर्ण निकाल दिला आहे. या प्रकरणात आरोपींच्या बाजूने ॲड. आदित्य ए. राख यांनी केलेला युक्तिवाद प्रभावी ठरला.

या बाबत अधिक माहिती अशी की, फिर्यादीने उमेश भोसले व इतर चार जणांविरुद्ध अंमळनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला होता. फिर्यादीच्या तक्रारीनुसार, दिनांक ३० जुलै २०२४ रोजी मध्यरात्री साडेबारा वाजण्याच्या सुमारास आरोपींनी त्यांच्या घरात प्रवेश करून दरोडा टाकला. यावेळी फिर्यादी व त्यांच्या पत्नीला लोखंडी पाईप आणि चाकूच्या साहाय्याने मारहाण करून गंभीर जखमी करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला होता. तसेच घरातील सुमारे १ लाख १० हजार रुपये किंमतीचे सोने-चांदीचे दागिने व रोख रक्कम लंपास केल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले होते.

या प्रकरणी अंमळनेर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता () कलम ३०९(६) व ३१०(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणाचा तपास पूर्ण झाल्यानंतर पोलिसांनी न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले. सुनावणीदरम्यान सरकार पक्षाकडून एकूण चार साक्षीदार तपासण्यात आले. मात्र, खटल्यादरम्यान सादर झालेला पुरावा, साक्षीदारांच्या साक्षीतील विसंगती तसेच आरोपींच्या बचाव पक्षाने मांडलेले मुद्दे न्यायालयाने गांभीर्याने विचारात घेतले. तसेच अँड. आदित्य राख यांनी सखोल कायदेशीर अभ्यासावर आधारित युक्तिवाद सादर करत सरकार पक्षाचा आरोप संशयाच्या पलीकडे सिद्ध झालेला नसल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले.

दोन्ही बाजूंचा युक्तिवाद, उपलब्ध पुरावे व प्रकरणातील सर्व बाबींचा विचार करून जिल्हा व सत्र न्यायालयाने आरोपींविरुद्धचे आरोप सिद्ध होत नसल्याचे नमूद करत सर्व पाचही आरोपींची निर्दोष मुक्तता केली. या प्रकरणात आरोपींच्या वतीने ॲड. आदित्य ए. राख यांनी प्रभावीपणे बाजू मांडली. त्यांना ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. प्रवीण राख यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच

ॲड. जे. एल. पठाण, ॲड. एम. ए. तांबोळी, ॲड.आर. एस. कोरडे, ॲड. डी. व्ही. जाधव, ॲड.पालवे आणि ॲड. शलभ राख यांनीही सहकार्य केले.

## शेतकरी कर्जमाफीवरील अन्यायकारक अटी रद्द करून संपूर्ण कर्जमाफी द्या -अखिल भारतीय किसान सभा

माजलगाव । प्रतिनिधी

राज्य सरकारने शेतकऱ्यांना कर्जमाफीचे आश्वासन दिले असले तरी अद्याप त्याची प्रभावी अंमलबजावणी झालेली नाही. सरकारने जाहीर केलेल्या कर्जमाफी योजनेत अनेक जाचक अटी घालण्यात आल्याने लाखो शेतकरी कर्जमाफीपासून वंचित राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे या अन्यायकारक अटी रद्द करून सर्व पात्र शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी देण्यात यावी,अशी मागणी अखिल भारतीय किसान सभा, माजलगाव तालुका समितीच्या वतीने तहसीलदार यांना दि १२ जुन शुक्रवार रोजी दिलेल्या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.




निवेदनात म्हटले आहे की, दोन लाख रुपयांपर्यंतच्या कर्जाची मर्यादा घालण्यात आल्याने राज्यातील सुमारे दोन लाख दहा हजार शेतकरी कर्जमाफीपासून वंचित राहत आहेत.नैसर्गिक आपत्ती, शेतीमालाला न मिळणारा हमीभाव आणि चुकीच्या सरकारी धोरणांमुळे शेतकऱ्यांवर कर्जाचा बोजा वाढला असून दोन लाखांची मर्यादा रद्द करून संपूर्ण कर्जमाफी देण्यात यावी.सन २०१९ मधील कर्जमाफीचा लाभ घेतलेल्या व नंतर पुन्हा कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांनाही यावेळी कर्जमाफीपासून वगळण्यात आले आहे. तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना केवळ ५० हजार रुपयांचे प्रोत्साहन देण्याची अट अन्यायकारक असून त्यांनाही संपूर्ण कर्जमाफीचा लाभ देण्याची मागणी करण्यात आली आहे. वरील मागण्यांच्या पूर्ततेसाठी तीव्र निदर्शने करून शासनाच्या कर्जमाफीच्या जी आर ची होळी करण्यात आली या आंदोलनात माकप ता.सचिव कॉ.शिवाजी कुरे, कॉ.बाबा सर,किसान सभा ता.सचिव कॉ. कृष्णा सोळंके, कॉ. गणेश कदम, कॉ.बंडूराम गरड, कॉ.विकास थेटे, रामचंद्र चिंचाने, आ.बा.राठोड,पांडुरंग सोळंके,दत्तात्रय बादाडे,चंद्रकांत गाते,सुदर्शन हिवरकर,ज्ञानेश्वर गरड व बहुसंख्य शेतकरी उपस्थित होते.

## चौसाळा महसूल मंडळात मोफत बियाणे वाटपात घोटाळ्याचा आरोप; २०० शेतकरी लाभापासून वंचित

चौसाळा । प्रतिनिधी

चौसाळा महसूल मंडळात मोफत बियाणे वाटप योजनेत मोठ्या प्रमाणात अनियमितता झाल्याचा आरोप शेतकऱ्यांकडून केला जात आहे. सुमारे २०० पात्र शेतकरी लाभापासून वंचित राहिल्याचे सांगितले जात असून, महाधन (महाबीज) अधिकाऱ्यांकडून बियाणे वितरणाबाबत टाळाटाळ केली जात असल्याची शेतकरी वर्गाची तक्रार आहे.शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, योजनेसाठी आवश्यक पात्रता पूर्ण करूनही अनेकांना बियाणे मिळाले नाही.काही मोजक्या लाभार्थ्यांनाच बियाणे वाटप करून उर्वरित शेतकऱ्यांना वारंवार कार्यालयाचे उंबरठे झिजवावे लागत आहेत. याबाबत कृषी विभागाकडे वारंवार पाठपुरावा करूनही कोणतीही ठोस कार्यवाही होत नसल्याचा आरोप करण्यात येत आहे.दरम्यान, खरीप हंगाम तोंडावर असताना बियाण्यांअभावी शेतकरी चिंतेत असून, या प्रकरणाची सखोल चौकशी करून वंचित शेतकऱ्यांना तातडीने बियाणे उपलब्ध करून द्यावीत,अशी मागणी सेवा सोसायटी चेअरमन दत्तात्रय नाईकवाडे यांनी केली आहे.कृषी विभाग आणि संबंधित अधिकाऱ्यांनी याकडे गांभीर्याने लक्ष देऊन शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.कृषी विभागाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.तात्काळ पात्र उर्वरित शेतकरी यांना बियाणे वाटप करा नसता तालुका कृषी अधिकारी यांच्या कार्यालयावर आंदोलन करणार असे शेतकरी नेते दत्तात्रय नाईकवाडे यांनी इशारा दिला आहे.

बियाणे वाटप न झाल्यास तालुका कृषी अधिकारी कार्यालयासमोर आंदोलनाचा इशारा - दत्तात्रय नाईकवाडे

चौसाळा महसूल मंडळातील पात्र शेतकऱ्यांना तातडीने मोफत बियाण्यांचे वाटप करण्यात यावे, अन्यथा तालुका कृषी अधिकारी कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा शेतकरी नेते दत्तात्रय नाईकवाडे यांनी दिला आहे.

## जुन्या परळी शहर भागात सीसीटीव्ही बसवा; भुरट्या चोरांचा तात्काळ बंदोबस्त करा

**पोलीस निरीक्षक नाचन यांना नागरिकांचे निवेदन; वर्षभरानंतरही मागणी प्रलंबित**

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

परळी शहरातील जुन्या गावभागात वाढत्या भुरट्या चोरीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीती आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले असून, परिसरात तात्काळ सीसीटीव्ही कॅमेरे बसवून चोरीच्या घटनांवर आळा घालावा, अशी जोरदार मागणी नागरिकांनी शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नाचन यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

गणेश पार, उखळवेस, होळकर चौक, भीमनगर, जगतकर गल्ली, प्रबुद्धनगर, रमाईनगर, साठेनगर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह चौक, देवी मंदिर परिसर आणि आपना चौक या भागांमध्ये वारंवार होत असलेल्या चोरीच्या घटनांमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. या भागात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची मागणी नागरिकांनी यापूर्वी शहर पोलीस ठाणे, नगरपरिषद परळी वैजनाथ आणि पोलीस अधीक्षक कार्यालय, बीड येथे केली होती. मात्र वर्षभर उलटूनही कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्याने नागरिकांनी नाराजी व्यक्त केली.

निवेदनात उखळवेस, अण्णाभाऊ साठे समाज मंदिर परिसर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह चौक, भीमनगर, जगतकर गल्ली, प्रबुद्धनगर चौक आणि आपना चौक या महत्त्वाच्या ठिकाणी



अत्याधुनिक सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच पोलीस आणि नगरपालिका प्रशासनाने या गंभीर प्रश्नाकडे दुर्लक्ष केल्याचा आरोपही करण्यात आला.

नागरिकांच्या म्हणण्यानुसार, परिसरात दुचाकी वाहनांमधील पेट्रोल चोरी, रिक्षांमधील बॅटरी चोरी, पाण्याच्या मोटारी, गॅस सिलिंडर, सायकली, गार्डन पाईप, पाण्याच्या टाक्या, बांधकाम साहित्य, स्टील, किराणा दुकानांतील रोख रक्कम, बोअरवेलच्या वायर व मशीन, मोबाईल फोन तसेच महागड्या चप्पल-बूट चोरीच्या घटना सातत्याने घडत आहेत. लहान मुलांच्या गळ्यातील सोन्याचे दागिने आणि चांदीच्या वस्तू चोरीला जाण्याच्या घटनांमध्येही वाढ झाल्याचे नागरिकांनी नमूद केले. परिसरात सुरू असलेल्या अवैध हातभट्टी दारू विक्रीमुळे अनेक तरुण व्यसनाधीन होत असून, त्यातूनच चोरीच्या घटनांना खतपाणी मिळत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. त्यामुळे अवैध धंद्यांवर कठोर कारवाई करून परिसर गुन्हेमुक्त करण्याची मागणीही निवेदनातून करण्यात आली. याशिवाय जुन्या गावभागात रात्रीच्या वेळी नियमित पोलीस गस्त वाढविण्यात यावी, किमान दोन वेळा पेट्रोलिंग करावे आणि गणेश पार येथील बंद पडलेली पोलीस चौकी तात्काळ सुरू करावी, अशी मागणी विविध सामाजिक, राजकीय व नागरिक प्रतिनिधींनी केली आहे. नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने सीसीटीव्ही बसविणे, पोलीस गस्त वाढविणे आणि चोरीच्या घटनांवर प्रभावी नियंत्रण आणण्यासाठी तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. यावेळी माजी नगराध्यक्ष दीपक देशमुख, बाबा शिंदे, कामगार नेते गौतमभाई आगळे, प्रल्हाद सुरवसे, संपादक बालाजी जगतकर, वैजनाथ कळसकर, राजाभाऊ जगतकर, प्रशांत रोडे, देविदास जंगले यांच्यासह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पान ६ वरून...

### बिंदुसरा नदी पात्रात

शंका व्यक्त करण्यात आली आहे. वारंवार तक्रारी व आंदोलने होऊनही प्रभावी कारवाई न झाल्यामुळे या संशयाला अधिक बळ मिळत असल्याचे कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे.या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्यासाठी जलसंपदा विभाग, नगर रचना विभाग, नगर परिषद, महसूल विभाग व इतर संबंधित यंत्रणांच्या अधिकाऱ्यांचा समावेश असलेली संयुक्त चौकशी समिती नेमण्यात यावी, संबंधित बांधकामांच्या परवानग्या, मंजूर नकाशे, भोगवटा प्रमाणपत्रे, पूर्णत्व प्रमाणपत्रे व इतर अभिलेखांची तपासणी करण्यात यावी तसेच पूररेषा क्षेत्रात येणाऱ्या सर्व मालमत्तांची अधिकृत यादी तयार करण्यात यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.तसेच रेड फ्लड लाईन किंवा ब्ल्यू फ्लड लाईन क्षेत्रामध्ये नियमबाह्यरीत्या मंजूर अथवा उभारण्यात आलेली बांधकामे आढळल्यास संबंधित अधिकारी, कर्मचारी, विकासक, भूमाफिया व इतर जबाबदार व्यक्तींविरुद्ध विभागीय, फौजदारी व अन्य कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.सार्वजनिक हित, पर्यावरण संरक्षण, नदी संवर्धन, आपत्ती व्यवस्थापन तसेच नागरिकांच्या जीवित व मालमत्तेच्या सुरक्षिततेशी संबंधित हा अत्यंत गंभीर विषय असल्याने प्रशासनाने तातडीने दखल घेऊन संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करावी व चौकशी अहवाल सार्वजनिक करावा, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते रामनाथ खोड यांनी निवेदनाद्वारे केली आहे

### तुकाराम मुंढेची धास्ती

दिले जाणारे पदार्थ योग्य की अयोग्य याबाबत देखील त्यांनी आता तपासण्या सुरू करून कारवाई सुरू केली आहे राज्यभरात सुरू असलेली ही कारवाईफत बीड जिल्ह्यातील अनेक व्यवसायिकांनी भेसळखोर धास्तावयाची दिसून येत आहे विशेषता बीड शहरातील अनेक नामांकित हॉटेल गेल्या तीन दिवसापासून बंद आहे शिवाय बीड जिल्ह्यातील अनेक ढाबे नामांकित चहाची हॉटेल बेकरी स्वीट्स अशा व्यवसायिकांची चांगलीच पाचावर धारण बसली आहे तुकाराम मुंडे यांच्या कारवाईनंतर आता त्यांची राज्यातील संपूर्ण प्रशासन कामाला लागले आहे याची जास्ती बीड जिल्ह्यातील काही व्यवसायिकांनी घेतली असून गेल्या काही दिवसापासून अनेक हॉटेल धाबे दुकाने बंद आहेत तर पान टपऱ्यावर चोरून चालणारा गुटखा देखील आता दिला जात नाही त्यामुळे मुंडे यांच्या हस्तेमुळे जिल्ह्यातील अनेक हॉटेल धावे आणि दुकाने गेल्या चार दिवसापासून बंद असल्याचे दिसत आहे

### 'दारुल उलुम मदरसा' संस्थेच्या

असल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. या प्रकरणी संबंधित विभागाने तातडीने दखल न घेतल्यास सत्ताधारी आमदारांमार्फत आगामी पावसाळी अधिवेशनात हा प्रश्न मांडण्यात येईल, असा इशाराही निवेदनात देण्यात आला आहे. या संदर्भात धर्मादाय आयुक्त (मुंबई/बीड), धर्मादाय सहाय्यक आयुक्त (लातूर), मुख्यमंत्री (मुंबई), अल्पसंख्यांक मंत्री आणि जिल्हाधिकारी (बीड) यांना पुराव्यांसह (ॲग्रीमेंट प्रत, ऑडिट रिपोर्ट, सातबारा व शेड्युल १) निवेदन सादर करण्यात आले आहे.

### धर्मापुरीत 'एलसीबी'चा

बाबूलाल आतार याच्या घरावर छापा टाकण्यात आला. या छाप्यात घरातून गांजाचा मोठा साठा आणि विक्रीसाठी वापरण्यात येणारा एक इलेक्ट्रिक वजनकाटा हस्तगत करण्यात आला.या प्रकरणी सपोनि धनराज जारवाल यांच्या फिर्यादीवरून परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात आरोपी. शेख बाबूलाल अतार. वशीम बाबूलाल अतार (दोघे रा. धर्मापुरी, ता. परळी, जि. बीड) यांच्याविरुद्ध गु.र.नं. २७४/२०२६ कलम २०, २९ एन.डी.पी.एस. (छऊझड) क्ट नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास परळी ग्रामीण पोलीस करत आहेत.

सदरची धडक कारवाई प्रभारी पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके मॅडम, सहायक पोलीस अधीक्षक श्री. ऋषिकेश शिंदे (उपविभाग अंबाजोगाई), आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत सपोनि धनराज जारवाल, पोलीस अंमलदार दिलीप गिते, भागवत शेलार, दीपक खांडेकर, महिला पोलीस अंमलदार स्वाती मुंडे, चालक पोलीस अंमलदार हराळे, तसेच परळी ग्रामीण पोलीस ठाण्याचे सपोनि मेंडके, पोलीस अंमलदार वाले आणि नवनाथ हरगांवकर यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

### मोठेवाडीत सरकारविरोधात

अंमलबजावणी झालेली नसल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी आहे. बीड जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांना प्रति हेक्टर १७,५०० रुपये पीकविमा तात्काळ मंजूर करून वितरित करावा, अशी मागणी शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने करण्यात आली. या मागण्यांसाठी शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने मोठेवाडी येथे रॅली काढण्यात आली. रॅलीनंतर गावातील मुख्य चौकात शासनाच्या कर्जमाफी निर्णयाची प्रतीकात्मक होळी करून निषेध नोंदविण्यात आली. यावेळी सुदर्शन हिवरकर, विद्यासागर करपे, राजेभाऊ पास्टे, अंगद खेत्री , ज्ञानेश्वर खेत्री, तुळशीराम रेडे, प्रकाश इके,सुभाष यादव,आदित्य गोंडे,दत्ता चव्हाण, यांच्यासह परिसरातील मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

### बीबीएफ यंत्राद्वारे पेरणी केल्यास

किफायतशीर बनते. हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर शाश्वत शेतीसाठी बीबीएफ तंत्रज्ञान प्रभावी ठरत असल्याचे कृषी विभागाने स्पष्ट केले आहे.कृषी विभागाच्या वतीने तालुक्यात विविध गावांमध्ये शेतकरी जनजागृती कार्यक्रम, शेती शाळा व मार्गदर्शन शिबिरांच्या माध्यमातून बीबीएफ पद्धतीचे महत्त्व पटवून दिले जात आहे. तालुक्यातील शेतकऱ्यांनी आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा अवलंब करून बीबीएफ यंत्राद्वारे पेरणी करावी आणि अधिक उत्पादनाच्या दिशेने वाटचाल करावी, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी विजयकुमार पवार यांनी केले आहे.

# पुरंदर विमानतळासाठी या तारखेपासून सक्तीने भूसंपादन

## शेतकऱ्यांना १० टक्के परतावा मिळण्याबाबत शंका

पुणे / प्रतिनिधी

पुरंदर येथील प्रस्तावित छत्रपती संभाजीराजे आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी ३० जूनपर्यंत संमतीने भूसंपादन करण्यात येणार आहे. मात्र, १ जुलैपासून या प्रकल्पासाठी कायद्यानुसार सक्तीने भूसंपादन होणार आहे.जिल्हा प्रशासनाने संमतीपत्रासाठी दिलेली १० जूनची मुदत वाढवून मिळावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली होती. त्यानुसार ही मुदतवाढ दिल्याची माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली. विमानतळासाठी आतापर्यंत आवश्यक असलेल्या ७० टक्के अर्थात ८५१ हेक्टरचे संपादन झाले असून, ९५० कोटी रुपयांचा मोबदला शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा झाला आहे. याबाबत डुडी म्हणाले, विमानतळासाठी आवश्यक असलेल्या १ हजार २१६ हेक्टर क्षेत्रापैकी ८५१ हेक्टर जमिनीचे संपादन पूर्ण झाले असून सुमारे ७० टक्के करारनामे केले आहेत. या भूसंपादनापोटी आतापर्यंत ९५० कोटी रुपयांच्या मोबदल्याचे वाटप झाले आहे. एकूण भूसंपादनासाठी सुमारे ६ हजार कोटी रुपयांची आवश्यकता असून हा निधी टप्प्याटप्प्याने प्राप्त होत आहे. शेतकऱ्यांचा प्रतिसाद वाढला असून करारनाम्यांचे प्रमाणही वाढले आहे. करारनामे होताच शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे जमा केले जात असल्याने जिल्हा प्रशासनाला पैशांची गरज भासत आहे. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी एमआयडीसीकडे २ हजार कोटी रुपयांची मागणी केली आहे. पुढील आठवड्यात मंगळवारपर्यंत हे पैसे जिल्हा प्रशासनाला प्राप्त होतील, अशी माहिती डुडी यांनी दिली. भूसंपादनासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी १० जूनची मुदत दिली होती. याकाळात संमतीपत्रे स्वीकारण्यात येणार होती. मात्र, काही शेतकऱ्यांच्या जमिनींचे मूल्यांकन, न्यायालयीन दावे, महसूल विभागातील प्रकरणे, नाव दुरुस्ती, वारस नोंदी, हक्कसोडपत्र आणि इतर महसुली प्रक्रिया प्रलंबित आहेत. या अडचणी दूर करण्यासाठी प्रशासनाकडून प्रयत्न सुरू असले तरी त्यास काहीसा कालावधी लागत आहे. या पार्श्वभूमीवर शेतकरी, ग्रामपंचायत प्रतिनिधींनी मुदतवाढीची मागणी होती.



**तर १० टक्के परतावा मिळणार नाही**

सर्व बाबींचा विचार करून भूसंपादनाच्या संमती व मोबदला स्वीकारण्यासाठी ३० जूनपर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे, असे डुडी यांनी स्पष्ट केले. या मुदतवाढीमुळे प्रलंबित कागदपत्रे आणि महसुली प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी शेतकऱ्यांना अतिरिक्त वेळ मिळणार असून उर्वरित जमीन संपादनाची प्रक्रिया अधिक सुलभ होण्यास मदत होईल, असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे. संमतीपत्रांसाठी ही शेवटची मुदत असणार आहे. त्यानंतर अर्थात १ जुलैपासून महाराष्ट्र औद्योगिक महामंडळाच्या कायद्यानुसार सक्तीचे भूसंपादन करण्यात येणार आहे. त्यामुळे अशा शेतकऱ्यांना १० टक्के परतावा मिळणार नाही.

# ग्रो स्ट्रीम, पिकांसाठी अत्यंत उपयुक्त पद्धत

पिकांना पाण्याची अत्यंत आवश्यकता असते. आपण पिकांना पाणी देतो. परंतु किती पाण्याचा १००% व्यवस्थित उपयोग होतो याचा विचार आपण कधी गेला आहे का? कधी कधी आपण पिकांना पाणी देण्याची गरज नसताना देखील पाणी देतो. आपण बऱ्याच प्रमाणात आता ठिबक आणि तुषार सिंचनाचाउपयोगा पिकांना पाणी देण्यासाठी करतो. यामध्ये पाण्याची बचत होते हे खरेच आहे. परंतु बऱ्याचदा विजेच्या लपंडावामुळे ठिबकद्वारे देखील पाणी योग्य वेळीआणि योग्य प्रमाणात देणे शक्य होत नाही.म्हणून ठिबक सारखे सारखे तंत्रज्ञान असून देखील पाण्याचे योग्य व्यवस्थापन करणे कठीण जाते. सध्या पाण्याचा कार्यक्षम वापर व्हावा आणि पिकांच्या गरजेनुसार पिकांना पाणी देण्यात यावी यासाठी ड्रोनचा देखील वापर होऊ लागला आहे. परंतु हे तंत्रज्ञान वापरणे अल्पभूधारक व सामान्य शेतकऱ्यांसाठी आवाक्याबाहेरचे व आर्थिक दृष्ट्या परवडण्यासारखे नाही. यासाठी ग्रो स्ट्रीम सारखे तंत्रज्ञान अधिक फायदेशीर ठरू शकणार आहे.



**काय आहे नेमके हे तंत्रज्ञान?**

पिकांना पाण्याचा ताण पडला किंवा पिकांना पाण्याची गरज आहे हे प्रामुख्याने जेव्हा पिकाच्या मुळांच्या परिसरामध्ये मुळाकडून विशिष्ट प्रकारचे रसायन उत्सर्जित केले जातात. त्यांचे महत्त्वाचे काम असते की पाणी आणि आवश्यक अन्नद्रव्य शोषण हे होय. हे पिकांना असलेली पाण्याची गरज आणि उत्सर्जनाचे प्रमाण हे बाहेरील वातावरणानुसार बदलत असते. जेव्हा पीक वाढत असते तेव्हा त्याच्या विविध अवस्थांनुसार त्यामध्ये योग्य बदल होत जातात अव्यवस्था नुसारच वातावरणाशी जुळवून घेत योग्यत्याच प्रमाणात पिकाकडून पाण्याची मागणी केली जाते.

ही सगळी प्रक्रिया सेंद्रिय रसायनांच्या माध्यमातून कार्यरत असते. त्यामुळे पिकांच्या पाण्याच्या मागणीला योग्य प्रकारे न्याय देणारे व पिकांना आवश्यक तेवढेच पाण्याचा तो अन्नद्रव्यांचा पुरवठा करणारे ग्रो स्ट्रीम सिंचन प्रणालीउपयोगी पडते. हे प्रणाली रिस्पॉनसिव्ह ड्रिप इरिगेशनया कंपनीने विकसित केली आहे.या तंत्रज्ञानात लॅटरलमध्ये पोअर फिल्ड पॉलिमर चा वापर केला जातो. त्याद्वारेज्या पिकांना पाण्याची गरज असते त्यांच्याकडून सोडलेल्या रसायनांचा वेध घेतला जातो. जेव्हा वनस्पतीं कडून ही रसायने सोडली जातात त्यावेळी लॅटरल मध्ये असलेल्या सूक्ष्म छिद्रा द्वारे लॅटरल मधून पाणी सोडले जाते. जेव्हा वनस्पतीची पाण्याची गरज पुर्ण होते तेव्हा वनस्पती कडून सोडले जाणारे रसायने आपोआप थांबतात व लॅटरल मधून सोडले जाणारे पाण्याचा पुरवठा देखील आपोआप बंद होतो. म्हणजेच पिकाच्या पाण्याची जेवढी गरज तेवढीच पाणी या ड्रीप यंत्रणे द्वारे दिले जाते. या तंत्रज्ञानाचा वापर अबू धाबी येथील शेतकरी वाळवंटी प्रदेशातस्थानिक भाजीपाल्यांच्या उत्पादनासाठी करत आहेत.पारंपारिक ठिबक पद्धतीपेक्षा या मध्ये ५० टक्के अधिक पाण्याची बचत होत असल्याचा दावा तेथील शेतकऱ्यांनी केला आहे.

# फळबागामध्ये आंतरपीक घेण्यासाठी कंद पिकांची लागवड फायदेशीर

फळबागांचे क्षेत्र वाढावे यासाठीराज्य कृषी विभाग आग्रही आहे. सरकार विविध योजना आणत आहे. दरम्यान राज्यातील अनेक जिल्ह्यात फळबागा घेतल्या जात आहेत. फळबागा घेतली म्हणजे आर्थिक उत्पन्नाला वेळ असतो असे नाह. फळ पिकांमध्ये आंतरपीक घेऊन आपण अधिकचा आर्थिक नफा मिळू शकतो. आंतरपीक म्हणून कंद पिकाची योग्य निवड तसेच कमी कालावधीच्या जातीची निवड करणे आवश्यक आहे.कंद पिकासाठी वेगळे खत व पाणी व्यवस्थापन करावे. त्यामुळे मुख्य पिकाची वाढ आणि उत्पादनावर विपरीत परिणाम होणार नाही. कोकणामध्ये आंबा, काजू, नारळ, सुपारी मध्ये आंतरपीक म्हणून काही कंदवर्गीय पिकांची लागवड फायदेशीर ठरू शकते. राज्यातील अनेक भागात नवीन लागवड केलेल्या बागांमध्ये कांदा पिकाचा समावेश आंतरपीक म्हणून करावा.

कंद पिकाची आंतरपीक म्हणून लागवड करताना मुख्य फळपिकांच्या कामांमध्ये अडथळा येणार नाही याची काळजी घ्यावी. फळ पिकामध्ये आंतरपीक म्हणून कंद पिकाची योग्य निवड तसेच कालावधीच्या जातीची निवड करणे आवश्यक आहे. मुख्य पिकाशी अन्नद्रव्य, पाणी,सूर्यप्रकाश इत्यादी मूलभूत गोष्टींची मोठ्या प्रमाणावर स्पर्धा होणार नाही याकडे लक्ष द्यावे. कांदा पिकासाठी वेगळे खत व पाणी व्यवस्थापन केले पाहिजे. त्यामुळे मुख्य पिकाची वाढ आणि उत्पादनावर विपरीत परिणाम होणार नाही. आंतरपिकाची लागवड करताना मुख्य पिकाचे वय, लागवडीचे अंतर झाडाचा विस्तार,झाडाची ठेवण, मुळाचा विस्तार, मधल्या जागेतील सूर्यप्रकाशाची उपलब्धता, सिंचन सुविधा, जमिनीचा प्रकार, पिकाचा कालावधी इत्यादी बाबींचा विचार करावा. मुख्य फळ पिकांमध्ये लागवडीच्या सुरवातीच्या कालावधीत पुरेशा प्रमाणात जागा उपलब्ध असल्यामुळे कंद पिकाची सलग लागवडी प्रमाणे लागवड करण्यास हरकत नाही. मात्र जसजशेफळ पिकाचे वय व विस्तार वाढेल तसतसे पीकनिहाय कंद पिकाची नेहमीच्या लागवड पद्धतीमध्ये योग्य ते बदल करून घ्यावेत.

कोणत्या कंद पिकाचे घेणार आंतरपीक :आंबा कनगर,घोरकंद, काजू कनगर, घोरकंद, कादा, रताळी, नारळ सुरण, वडीचा अळू, आरारूट, घोरकंद, शेवरकंद, अळू, सुपारी, वडीचा अळू, घोरकंद, सुरण,

आंतरपिकासाठी लागवड पद्धती :

आंबा व काजू मध्ये कंद पिकाची लागवड करताना खरीप हंगामात बागेतील मधल्या जागेत कनगर, का रंदा,घोरकंद यासाठी ९० सेंटिमीटर अंतरावर लागवड करावी. रताळी पिकासाठी ६० सेंटिमीटर अंतरावर सऱ्या करून लागवड करावी. अतिपावसाच्या प्रदेशात कंद पिकांची लागवड जमिनीचा उतार लक्षात घेऊन करावे. रताळ्या सारख्या पिकामुळे जमिनीवर अच्छादन तयार होऊन जमिनीची धूप कमी होते तसेच पाणी मृदा संधारणाचे काम होते.

नारळ बागेतील आंतरपिके : योग्य अंतर ठेवलेल्या बागेमध्ये सूर्यप्रकाशाची उपलब्धता आंतरपिकासाठी होऊ शकते. नारळाच्या बुंध्यापासून २ मीटर अंतर सोडून मधल्या जागेत आंतरपिके घ्यावीत. सुरणाची लागवड ६० सें.मी. बाय ६० सें.मी. अंतरावर तसेच शेवर कंदाची लागवड ९० सें.मी. अंतरावर सऱ्या करून करावी. वडीचा अळू साठी नेहमीच्या ७५ सें.मी. बाय ७५ सें.मी. अंतरापेक्षा जवळ लागवड करावी.सुपारी बागेत आंतरपीक : झाडाच्या मधल्या उपलब्ध जागेत सुरण, आरारूट, वडीचा अळू या पिकाची लागवड करता येते. तर घोरकंदाच्या वेली सुपारीवर चौकट करून त्यावरचढविता येणे शक्य आहे.

# कोणत्याही पिकासाठी स्लरी महत्वाची; जाणून घ्या स्लरीचे प्रकार आणि फायदे

स्लरी हे कोणत्याही पिकाला फार फायदेशीर आहे. परंतु अजूनही शेतकरी त्याकडे पूर्ण लक्ष देतांना दिसत नाही. स्लरी चे जर बहुरंगी उपयोग पाहिले तर स्लरीशिवाय पर्याय नाही, असे दिसून येते.

स्लरीच्या वापराचे फायदे : जर स्लरीचा उपयोग शेतात गेला तर जमिनीमधील सूक्ष्म जिवाणू कार्यप्रवण होतात. कारण त्यांना ऊर्जा मिळते व त्या जिवाणूंमुळे जमिनीतील महत्त्वाचे अन्नद्रव्य पिकांना सहजरीत्या उपलब्ध होतात. असे स्लरी जमिनीचे भौतिक, जैविक आणि रासायनिक गुणधर्म वाढविते. स्लरीचा वापराने जमिनीतील पोकळी वाढवून हवा खेळती राहते. स्लरी मुळे मीनेरालीझेशन ची क्रिया लवकर होते. कारण हेच तयार झालेले इन ऑरगॅनिक स्वरूपातील अन्नद्रव्य विकत घेत असतात. तसेच लहरींमुळे जमिनीतील कर्ब आणि नत्र यांचे गुणोत्तर टिकून असते. जमिनीमध्ये कॅल्शियम कार्बोनेट जास्त प्रमाणात असेल तर पिकाच्या मुळ्या ब्लॉक होतात. जर स्लरीचा वापर केला तर संबंधित प्रॉब्लेम येत नाही.



स्लरी कशी बनवावी? सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे आपल्या जनावरांच्या गोठ्यामध्ये मलमूत्र साठवण्याची योग्य अशी सोय असावी. तसेच जनावरांची ताजी शेन उन्हात न ठेवता सावलीत ठेवावे. स्लरी बनवण्यासाठी मुख्यत: ३०० ते ४०० लिटर सिमेंटची टाकी असावी. स्लरी बनवतांना २०किलो शेन, दहा लिटर गोमूत्र, २०० ते २५० लिटर पाणी, सिमेंटच्या टाकीत टाकून चांगले हलवुन घ्यायचे. तसेच साधारणत: ३०० ते ३५० फळझाडांसाठी ताजी शेन २० किलो, जनावरांचे गोमूत्र १० लिटर, निंबोळी पेंड १५ किलो, युरिया पाच किलो, सिंगल सुपर फास्फेट १० किलो, पोटात पाच किलो आणि दोनशे ते अडीचशे लिटर पाणी या पद्धतीने मुख्य अन्नद्रव्यांची स्लरी बनवावी. व साधारणपणे महिन्यातून एकदा तरी प्रति झाड एक लिटर याप्रमाणे वापरावी.

जिवाणू स्लरी व तिचे प्रकार : नत्रयुक्त जीवाणू स्लरी मूळे हवेतील नत्र शोषले जाऊन ते पिकांना उपलब्ध करून दिले जाते. अविद्राव्य स्वरूपातील स्फुरद विरघळवून पिकांना उपलब्ध करून दिले जाते. सेंद्रिय पदार्थाचे जलद विघटन होते. बियाण्यांची उगवण क्षमता वाढवते. पिकांची जोमदार वाढ व रोग प्रतिकार शक्ती वाढते.जमिनीचा पोत सुधारण्यास मदत होते.तसेच रासायनिक खतांवरील खर्च कमी होतो.जिवाणू स्लरी कशी बनवावी? ताजे शेन २० किलो, जनावरांचे मूत्र दहा लिटर,काळा गूळ दोन किलो, ॲसेतोबॅक्टर ५०० ग्रॅम, फास्फेट सोलुब्लेसिंग मायक्रो ऑरगॅनिझम ५०० ग्रॅम, पोटॅश मोबिलीझर ५०० ग्रॅम, ई एम द्रावण एक लिटर व इतर जैविक बुरशीनाशके एक किलो ग्रॅम, दोनशे लिटर पाणी.सूक्ष्म व दुय्यम अन्नद्रव्य स्लरी : सूक्ष्म अन्नद्रव्य मुख्यत: झिंक फेरस हे जमिनीमध्ये असेच दिल्यास ते पिकाला पूर्णत: न लागता जमिनीत दुसऱ्या रूपात स्थिर होतात. म्हणून शक्यतो सूक्ष्म अन्नद्रव्ये जमिनीतून देत असताना स्लरीच्या स्वरूपात द्यावे. हि स्लरी बनवताना २० किलो ताजे शेण, जनावरांचे मूत्र दहा लिटर, निंबोळी पेंड १५ किलो,झिंक सल्फेट पाच किलो, फेरस सल्फेट तीन किलो, मॅगनीज दोन किलो, कॉपर सल्फेट १०० ग्रॅम वजन ३० ग्रॅम. दुय्यम अन्नद्रव्य स्लरी बनवताना ताजे शेण २० किलो, जनावरांचे मूत्र दहा लिटर, निंबोळी पेंड १५ किलो, कॅल्शियम १५ किलो, मॅग्नेशियम १५ किलो, गंधक १० किलो, २०० ते २५० लिटर पाणी द्यावे. या तयार मिश्रणाला दोन वेळेस चांगले हलवावे. सूक्ष्म आणि दुय्यम अन्नद्रव्य स्लरी मध्ये दहा ते बारा वर्षाचे अंतर ठेवावे.कडधान्य स्लरी : ताजे सेन २० किलो, गोमूत्र १० लिटर, ह्युमिक ॲसिड व व्हर्मीवॉश दोन लिटर, भर्डा कडधान्य प्रत्येकी एक किलोग्रॅम मुग, मठ, चवळी, हरभरा, मसूर, वाटाणा, उडीद, इ एम द्रावण दोन लिटर व २०० ते २५० लिटर पाणी. स्लरी बनवल्यानंतर हे द्रावण पाच ते सहा दिवस ठेवावे. तसेच दररोज सकाळी दोन मिनिट ठरवायचे व सातव्या दिवशी वापश्यावर जमिनीतून पीकाला आळवणी करावी. हे माप एक एकर क्षेत्रासाठी आहे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

११५८ : इसार नदीच्या काठावर म्यूनिच शहर स्थापन केले.
१७०४ : मुघलांच्या कैदेत असलेल्या संभाजीराजे यांच्या मुलाचे औरंगजेबाने लग्न लावून दिले.
१७७५ : अमेरिकन सैन्य दलाची स्थापना करण्यात आली.
१७७७ : अमेरिकेने 'स्टार्स अँड स्ट्राइप्स' या ध्वजाचा स्वीकार केला.
१७८९ : मक्यापासुन पहिल्यांदाच 'व्हिस्की' तयार करण्यात आली. तिला 'बोर्बोन' असे नाव देण्यात आले कारण तयार करणारा रेव्हरंड क्रेग हा केंटुकी प्रांतातील 'बोर्बोन' येथील रहिवासी होता.
१८९६ : महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी 'अनाथ बालिकाश्रम' ही संस्था स्थापन केली. यातुनच पुढे कर्वे स्त्री शिक्षण संस्था, एस. एन. डी. टी. विद्यापीठ असे मोठमोठे उपक्रम सुरू झाले.
१९०१ : पहिल्यांदा गोल्फ खेळाची प्रतियोगिता अमेरिकेत आयोजित करण्यात आली.
१९०७ : नॉर्वेत स्त्रियांना मतदानाचा अधिकार.
१९२६ : ब्राझील लीग ऑफ नेशन्समधून बाहेर.
१९३४ : ऑस्ट्रिया देशाची राजधानी वियना येथे जर्मन शासक हिटलर आणि मुसोलिनी यांची भेट झाली.
१९३८ : सुपरमॅनची चित्रपट कथा पहिल्यांदा प्रकाशित.
१९४० : जर्मनीने पॅरिस ताब्यात घेतल्यामुळे दोस्त राष्ट्रांनी तिथुन माघार घेतली.
१९४५ : भारताला स्वायत्तता देण्यासंबंधीची वेव्हेल योजना जाहीर
१९५२ : अमेरिकेने अणुशक्तीवर चालणारी पहिली पाणबुडी यू. एस. एस. नॉटिलस बांधण्यास सुरुवात केली.
१९६२ : पॅरिसमध्ये युरोपियन अंतराळ संशोधन संस्था स्थापन झाली नंतर युरोपियन स्पेस एजंसी बनली.
१९६७ : चीनने पहिल्या 'हायड्रोजन बॉम्ब' ची चाचणी केली.
१९६७ : मरिनर अंतराळ यान शुक्राकडे प्रक्षेपित.
१९७२ : डी. डी. टी. या कीटकनाशकाच्या वापरावर अमेरिकेत बंदी घालण्यात आली.
१९९९ : दक्षिण आफ्रिकेचे पहिले श्वेतवर्णीय राष्ट्राध्यक्ष नोबेल पारितोषिक विजेते नेल्सन मंडेला यांचा कार्यकाळ संपला.
२००१ : ए. सी. किंवा डी. सी. यापैकी कोणत्याही विद्युतप्रवाहावर चालणार्या उपनगरी गाडीचा शुभारंभ पश्चिम रेल्वेचे महाव्यवस्थापक वासुदेव गुप्ता यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून झाले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१३९८ : संत कबीर.
१४४४ : भारतीय खगोलशास्त्रज्ञ आणि गणितज्ञ निळकंथा सोमायाजी यांचा जन्म.
१७३६ : चार्ल्स कुलोम फ्रेन्च भौतिकशास्त्रज्ञ (मृत्यू: २३ ऑगस्ट १८०६)
१८६४ : अलॉइस अल्झायमर जर्मन मेंदुविकारतज्ञ (मृत्यू: १९ डिसेंबर १९१५)
१८६८ : कार्ल लॅन्ड्स्टायनर नोबेल पारितोषिक विजेते ऑस्ट्रियन जीवशास्त्रज्ञ (मृत्यू: २६ जून १९४३)
१८९९ : महावीर चक्र सन्मानित माजी भारतीय सैन्य अधिकारी ब्रिगेडियर राजिंदर सिंह यांचा जन्मदिन.
१९०० : भारतीय निबंध लेखक आणि मल्याळम साहित्यांचे साहित्यिक समीक्षक कारिककट्ट मराठू कुट्टिकृष्ण मरार यांचा जन्मदिन.
१९१६ : माजी भारतीय लष्कर प्रमुख अधिकारी दिवान प्रेम चंद यांचा जन्मदिन.
१९२० : प्रख्यात जैन धर्मीय स्वेतंबर तेरापंथ आदेशाचे दहावे प्रमुख, संत, योगी, अध्यात्मिक नेते, तत्वज्ञ, लेखक, वक्ते आणि कवी आचार्य श्री महाप्रज्ञ यांचा जन्मदिन.
१९२२ : के. असिफ हिन्दी चित्रपट निर्माते, दिग्दर्शक व पटकथालेखक (मृत्यू: ९ मार्च १९७१)
१९४६ : अमेरिकेचे विद्यमान राष्ट्राध्यक्ष डॉनल्ड ट्रम्प यांचा जन्मदिन.
१९५५ : सुप्रसिद्ध भारतीय हिंदी चित्रपट व दूरदर्शन मालिका अभिनेत्री, गायक, मनोरंजन निर्माता, टीव्ही टॉक शो होस्ट आणि भारतीय जनता पक्षाच्या सदस्या किरण अनुपम खेर यांचा जन्मदिन.
१९५९ : लोकप्रिय भारतीय तेलगु भाषिक वक्ता व सनातन धर्मीय भाष्यकार चगंती कोटेश्वरा राव यांचा जन्मदिन.
१९६७ : प्रसिद्ध भारतीय अब्जाधीश उद्योगपती आणि आदित्य बिर्ला समूहाचे अध्यक्ष कुमार मंगलम बिर्ला यांचा जन्मदिन.
१९६८ : प्रसिद्ध भारतीय महाराष्ट्रीयन राजकारणी तसचं, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे संस्थापक, अध्यक्ष राज ठाकरे यांचा जन्मदिन.
१९६९ : साली प्रसिद्ध जर्मन माजी व्यावसायिक टेनिसपटू स्टेफनी मारिया यांचा जन्मदिन. त्यांनी आपल्या कारकिर्दीत एकूण २२ ग्रँड स्लॅम एकेरीचे जेतेपद जिंकले आहे.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८२५ : पिअर चार्ल्स एल्फांट वॉशिंग्टन शहराचे रचनाकार फ्रेन्च अमेरिकन वास्तुविशारद आणि स्थापत्य अभियंता (जन्म: ९ ऑगस्ट १७५४)
१९१६ : गोविंद बल्लाळ देवल आद्य मराठी नाटककार, स्वतंत्र मराठी लेखन आणि इंग्रजी, फ्रेन्च व संस्कृत नाटकांची भाषांतरे इ. अनेक प्रकार त्यांनी हाताळले होते. (जन्म: १३ नोव्हेंबर १८५५)
१९२० : मॅक्स वेबर जर्मन अर्थशास्त्रज्ञ आणि समाजशास्त्रज्ञ (जन्म: २१ एप्रिल १८६४)
१९४६ : जॉन लोगीबेअर्ड, ब्रिटिश शास्त्रज्ञ, आद्य दुरचित्रवाणी संशोधक.
१९६१ : प्रसिद्ध भारतीय नोबल पारितोषिक वेजेते भौतिकशास्त्रज्ञ सी. वी. रमण यांचे शिष्य भौतिकशास्त्रज्ञ सर करिमानीक्कम श्रीनिवास कृष्णन यांचे निधन.
१९८९ : सुहासिनी मुळगांवकर अभिनेत्री व संस्कृत पंडित, मराठी रंगभूमीवरील एकपात्री नाट्यप्रयोगांची सुरुवात त्यांनी केली. ३१ जानेवारी १९६० रोजी 'सौभद्र' नाटकाचा पहिला एकपात्री प्रयोग त्यांनी केला. या नाटकाचे त्यांनी विक्रमी ५०० प्रयोग केले. (जन्म: ????)
२००७ : कुर्त वाल्ढहाईम संयुक्त राष्ट्रांचे चौथे सरचिटणीस (जन्म: २१ डिसेंबर १९१८)
२०१० : मनोहर माळगावकर इंग्रजी लेखक (जन्म: १२ जुलै १९१३)
२०११ : पद्मभूषण पुरस्कार सन्मानित रुद्विणा वादक भारतीय संगीतकार असद अली खान यांचे निधन.
२०२० : बॉलीवूड एक्टर सुशांत सिंग राजपुत यांच निधन.

cmyk




राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत

शनिवार दि.१३ जून २०२६ ५




# बोट दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर प्रशासन सतर्क

## सुरक्षा उपाययोजना करण्याचे जिल्हा प्रशासनाचे निर्देश

जालना । प्रतिनिधी

श्रीक्षेत्र पुरूषोत्तमपुरी ता. माजलगाव, जि. बीड येथे घडलेल्या बोट दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर अशा प्रकारच्या घटना पुन्हा घडू नयेत तसेच नागरिकांच्या जीवितास कोणताही धोका निर्माण होऊ नये, यासाठी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने सर्व संबंधित विभागांना तातडीच्या प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्याचे निर्देश दिले आहेत. निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जालना यांनी जारी केलेल्या आदेशानुसार महसूल, पोलीस, नगर परिषद आणि इतर संबंधित विभागांनी समन्वयाने कार्य करून नदी, तलाव, घाट परिसर आणि जलवाहतुकीच्या ठिकाणी सुरक्षा व्यवस्था अधिक सक्षम करण्यास सांगितले आहे.

प्रशासनाने दिलेल्या सूचनांनुसार उपविभागीय अधिकारी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी संबंधित विभागांची संयुक्त बैठक घेऊन गोळेगाव, सावंगी गंगाकिनारा आणि पुष्कराणी परिसरातील नौकाविहार, घाट परिसर, बोट वाहतूक व भाविकांच्या हालचालींसाठी स्वतंत्र मानक कार्यपद्धती तयार करून तिची काटेकोर अंमलबजावणी करावी, असे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच तहसीलदारांनी संबंधित परिसराची प्रत्यक्ष पाहणी करून सुरक्षा व्यवस्थेचे नियोजन करावे व तयार करण्यात आलेल्या एसओपीचे पालन होत असल्याची खात्री करावी, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे. प्रशासनाने विशेषतः नदीपात्रातील जलवाहतुकीवर लक्ष केंद्रित केले असून गोळेगाव, सावंगी गंगाकिनारा आदी ठिकाणी भाविकांची वाहतूक शक्यतो रस्तेमार्गाने (बाय रोड) वळविण्याच्या सूचना देण्यात याव्यात, असे स्पष्ट करण्यात आले आहे. भाविक



अथवा नागरिकांनी नदीपात्रातून किंवा बोटीच्या माध्यमातून प्रवास करू नये यासाठी जनजागृती मोहीम राबविण्याचेही निर्देश देण्यात आले आहेत. याशिवाय नदीपात्रातून प्रवासी वाहतूक करणाऱ्या विनापरवाना, अवैध अथवा असुरक्षित बोटींचे संचालन पूर्णतः बंद करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. अशा बोटी आढळून आल्यास संबंधितांविरुद्ध प्रचलित कायदे व नियमांनुसार तात्काळ कारवाई करण्यात येणार आहे. घाट परिसरात गर्दी नियंत्रण, प्रवेश व्यवस्थापन आणि सुरक्षा नियमांचे पालन यासाठी आवश्यक तेथे पोलीस बंदोबस्त वाढविण्यात येणार आहे. मुख्याधिकारी, नगर परिषद यांनी गोळेगाव व सावंगी गंगाकिनारा परिसरात आवश्यकतेनुसार स्वयंसेवकांची नियुक्ती करून नागरिकांना मार्गदर्शन, गर्दी व्यवस्थापन, सूचना प्रसारित करणे आणि सुरक्षा उपाययोजनांच्या अंमलबजावणीस मदत करण्याचे निर्देश दिले आहेत.

तसेच नदीपात्राकडे जाणाऱ्या प्रमुख मार्गांवर, घाट परिसरात आणि सार्वजनिक ठिकाणी धोक्याबाबतचे सूचना फलक, दिशादर्शक फलक व प्रतिबंधात्मक सूचना लावण्याचे आदेश देण्यात आले आहेत. महसूल, पोलीस, नगर परिषद आणि इतर विभागांनी संयुक्त गस्त घालून नियमित पाहणी करण्यासही सांगितले आहे. कोणत्याही प्रकारची दुर्घटना, आपत्कालीन परिस्थिती किंवा नियमभंगाची घटना निदर्शनास आल्यास संबंधित यंत्रणांनी तात्काळ प्रतिसाद देऊन आवश्यक कार्यवाही करावी, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे. तसेच उपविभागीय अधिकारी यांनी सर्व उपाययोजनांच्या अंमलबजावणीचा सातत्याने आढावा घेऊन आवश्यकतेनुसार अतिरिक्त उपाय सुचवावेत, असेही निर्देश देण्यात आले आहेत. तसेच सर्व संबंधित विभागांनी केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, यांच्याकडे सादर करावा, असे आदेशात नमुद करण्यात आले आहे. वरील सूचनांचे सर्व विभागांनी कठोर अंमलबजावणी करून नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

## जिल्हाधिकारी आशिमा मित्तल व एसपी संधू यांची अवैध वाळू उत्खननाविरोधात गोपनीय पाहणी



जालना। प्रतिनिधी

जिल्ह्यात गौण खनिजाच्या अवैध उत्खनन, वाहतूक आणि साठवणुकीला आळा घालण्यासाठी जिल्हा प्रशासनाने कठोर भूमिका घेतली असून, या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी आशिमा मित्तल आणि पोलीस अधीक्षक तेगबीर सिंग संधू यांनी गुरुवारी (११ जून) मध्यरात्री अंबड तालुक्यातील गोंदी परिसराला अचानक भेट देऊन परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी केली. या पाहणीदरम्यान अवैध वाळू उत्खनन आणि वाहतुकीसंदर्भातील हालचालींचा आढावा घेण्यात आला. तसेच महसूल, पोलीस, परिवहन आणि इतर संबंधित विभागांकडून राबविण्यात येणाऱ्या कारवायांची माहिती घेण्यात आली. अवैध खनिज उत्खनन रोखण्यासाठी विविध विभागांमध्ये अधिक प्रभावी समन्वय साधून संयुक्तरीत्या कारवाई करण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या.

जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक यांनी संबंधित अधिकाऱ्यांना संवेदनशील भागांमध्ये नियमित गस्त वाढविण्याचे निर्देश दिले. तसेच संयुक्त तपासणी मोहिमा आणि अचानक पाहणी मोहिमांना अधिक गती देऊन अवैध उत्खनन व वाहतुकीवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यावर भर देण्यात आला. जिल्ह्यातील सर्व विभागांनी अधिक दक्षता बाळगत अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी सक्रियपणे काम करावे, असेही त्यांनी स्पष्ट केले. प्रशासनाच्या माहितीनुसार, जिल्ह्यात गौण खनिजाच्या अवैध उत्खनन, वाहतूक आणि साठवणुकीबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नाही. अशा प्रकरणांतील प्रत्येक हालचालीवर जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक स्वतः लक्ष ठेवून आहेत. अवैध उत्खनन आणि वाहतुकीत सहभागी आढळणाऱ्या व्यक्ती, वाहनमालक तसेच संबंधित घटकांविरुद्ध प्रचलित कायदे व नियमांनुसार कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशाराही प्रशासनाने दिला आहे. यावेळी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी नागरिकांना आवाहन करताना सांगितले की, कोणत्याही व्यक्तीने अवैध गौण खनिज उत्खनन, वाहतूक अथवा साठवणुकीच्या प्रकारांमध्ये सहभागी होऊ नये. अन्यथा संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

जिल्ह्यात नैसर्गिक संपत्तीचे संरक्षण आणि कायद्याचे पालन सुनिश्चित करण्यासाठी प्रशासनाची कारवाई पुढेही अधिक तीव्रतेने सुरू राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. प्रशासनाच्या या अचानक पाहणीमुळे अवैध वाळू उत्खनन करणाऱ्या घटकांमध्ये खळबळ उडाली असून, जिल्ह्यातील अवैध खनिज व्यवसायावर अंकुश आणण्यासाठी प्रशासनाने मोहीम अधिक व्यापक करण्याचे संकेत दिले आहेत.

## नियतीचा क्रूर डाव, सात दिवसांतच नवविवाहितेचा दुर्दैवी अंत

### १५ वर्षांच्या प्रेमसंघर्षाचा दुर्दैवी शेवट

छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी

तब्बल १५ वर्षे एकमेकांवर जीवापाड प्रेम केल्यानंतर, अनेक कौटुंबिक व सामाजिक अडचणींवर मात करून अवघ्या सात दिवसांपूर्वी ४ जून रोजी विवाहबद्ध झालेल्या नवविवाहितेचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना शहरात घडली आहे. दीपाली लिहिणार असे मृत नवविवाहितेचे नाव आहे. लग्नाचे विधी संपण्यापूर्वीच आणि संसार सुरू होण्याआधीच तिचा अंत झाल्याने लिहिणार आणि खंडाळे या दोन्ही कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

या घटनेतील सर्वात चटका लावणारी बाब म्हणजे, मृत दीपाली लिहिणार आणि संदीप खंडाळे यांचा प्रेमप्रवास तब्बल १५ वर्षांचा होता. दीड दशक एकमेकांना सुख-दुःखात खंबीर साथ दिल्यानंतर, अखेर दोन्ही कुटुंबांच्या संमतीने ४ जून २०२६ रोजी अत्यंत थाटामाटात व आनंदाच्या वातावरणात हा विवाह सोहळा पार पाडला होता. दीड दशकाची प्रदीर्घ प्रतीक्षा संपवून दोन्ही जीव सुखी संसाराची स्वप्ने पाहत होते. लग्नानंतरच्या पारंपरिक विधींसाठी आणि पाठवणीसाठी दीपाली आनंदाने आपल्या माहेरी आली होती. घरात पाहुण्यांची वर्दळ आणि लग्नाची लगबग सुरूच असताना, संध्याकाळच्या सुमारास दीपाली बाथरूममध्ये गेल्या होत्या. तिथे अचानक त्यांना तीव्र चक्कर आली आणि त्या जमिनीवर कोसळल्या. खाली पडल्यामुळे त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. कुटुंबीयांनी तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले, मात्र दुर्दैवाने उपचारापूर्वीच डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

## ट्रक थेट लॉजमध्ये घुसला ; एकाचा मृत्यू, एक गंभीर

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

धुळे- सोलापूर महामार्गावरील छत्रपती संभाजीनगरच्या करोडी पुलाजवळ भीषण अपघात घडला. भरधाव वेगाने जाणाऱ्या ट्रकचा ताबा सुटल्याने ट्रक थेट रस्त्यालगत असलेल्या दामोधरण लॉजमध्ये घुसला. या अपघातात ट्रकमधील एकाचा मृत्यू झाला असून, दुसरा गंभीर जखमी झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ट्रक लासूरकडून छत्रपती संभाजीनगरच्या दिशेने येत होता. ट्रकमध्ये सुमारे ३२ टन वॉशिंग पावडरचा माल भरलेला होता. करोडी पुलाजवळ आल्यानंतर चालकाचा वाहनावरील ताबा सुटल्याने ट्रक थेट दामोधरण लॉजमध्ये घुसला. अपघाताच्या वेळी लॉजमध्ये कोणीही उपस्थित नसल्याने मोठी जीवितहानी टळली. मात्र, ट्रक आणि लॉजचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अपघातानंतर चालक आणि त्याचा सहकारी गंभीर जखमी झाले होते. दोघांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान एका जखमीचा मृत्यू झाला असून दुसऱ्यावर उपचार सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.अपघाताचे नेमके कारण काय, याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे.

## रसायनमिश्रित फळांचे साठे शोधून दोषींवर कठोर कारवाई करा - आ.राजेश पवार

नांदेड। प्रतिनिधी

आंबा व इतर फळांची केमिकलद्वारे कृत्रिम पिकवणी करून नांदेड जिल्ह्यात विक्रीस आणले जात असल्याची बाब गंभीर असून विशेष तपासणी मोहीम राबवून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी आमदार राजेश पवार यांनी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

नांदेड जिल्ह्यात सध्या आंबा हंगाम सुरू असून विविध बाजारपेठा, फळ विक्रेते, घाऊक व्यापारी तसेच कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात मोठ्या प्रमाणावर आंब्यांची विक्री होत आहे. नागरिकांकडून प्राप्त होत असलेल्या तक्रारी व उपलब्ध माहितीनुसार काही ठिकाणी आंबे व इतर फळे कृत्रिमरीत्या पिकविण्यासाठी प्रतिबंधित रसायनांचा, विशेषतः कॅल्शियम कार्बाइड सारख्या धोकादायक पदार्थांचा वापर केला जात असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. कॅल्शियम कार्बाइडचा वापर हा अन्न सुरक्षा नियमांचे उल्लंघन असून अशा प्रकारे पिकविण्यात आलेली फळे नागरिकांच्या आरोग्यास अपायकारक ठरू शकतात, विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक व आजारी व्यक्तींवर त्याचा विपरीत परिणाम होण्याची शक्यता असते. या प्रकाराची गंभीर जखम घेऊन नांदेड जिल्ह्यातील सर्व प्रमुख फळ बाजारपेठा, गोदामे, कोल्ड स्टोरेज, घाऊक व किरकोळ फळ विक्रेत्यांची विशेष तपासणी मोहीम राबविण्यात यावी. संशयित आआंबे व इतर फळांचे नमुने घेऊन ते शासनमान्य प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात यावेत. कॅल्शियम कार्बाइड अथवा इतर प्रतिबंधित रसायनांचा वापर होत असल्याचे आढळल्यास संबंधित व्यापारी, साठवणूकदार व जबाबदार व्यक्तींविरुद्ध कठोर कारवाई करण्यात यावी, मागील तीन वर्षांत जिल्ह्यात कृत्रिमरीत्या फळे पिकविण्याबाबत करण्यात आलेल्या कारवायांची माहिती उपलब्ध करून देण्यात यावी, आधी मागण्या आमदार राजेश पवार यांनी या निवेदनात केल्या आहेत.

## शीतपेयातून मद्य पाजून तरुणीवर अत्याचार; एकावर गुन्हा

धाराशिव। प्रतिनिधी

खोली भाड्याने मिळवून देण्याचे आमिष दाखवून एका ३४ वर्षीय तरुणीवर लैंगिक अत्याचार केल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी धाराशिव शहर पोलीस ठाण्यात एका तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित ३४ वर्षीय महिलेला संशयिताने खोली भाड्याने करून देण्याचे सांगितले. त्यानंतर तिला म्हशीच्या गोठ्यावर बोलावून तेथून जेवणासाठी हॉटेलमध्ये नेले. हॉटेलमध्ये शीतपेयामध्ये मद्य मिसळून पाजल्यानंतर तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप पीडितेने केला आहे. या प्रकरणी पीडितेने १० जून रोजी दिलेल्या फिर्यादीवरून धाराशिव शहर पोलीस ठाण्यात अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. फिर्यादी व आरोपीचे नाव पोलिसांनी गोपनीय ठेवले आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## ‘मी शेतकरी’ : भेदांच्या पलीकडे जाऊन समृद्धीकडे नेणारी जनचळवळ

आजचा समाज अनेक स्तरांवर विभागला गेला आहे. जात, धर्म, पंथ, राजकीय गट आणि वैयक्तिक मतभेद यांच्या भिंती दिवसेंदिवस उंचावत आहेत. परिणामी, विकासाच्या मार्गावर वाटचाल करण्याऐवजी समाज अनेकदा संघर्षाच्या भोवऱ्यात अडकताना दिसतो. अशा परिस्थितीत समाजाला एकत्र आणणाऱ्या विचारांची गरज अधिक प्रकर्षाने जाणवते. याच गरजेतून ग्लोबल विकास ट्रस्टने ‘‘मी शेतकरी’’ ही संकल्पना समाजासमोर मांडली. हा केवळ एक नारा नसून शेतकरी आणि ग्रामीण समाजाच्या एकीकरणाचा पाया आहे. माणसाची ओळख त्याच्या जाती, धर्म किंवा राजकीय विचारांपेक्षा त्याच्या श्रमातून आणि कर्तृत्वातून व्हावी, हा या संकल्पनेमागील मूलभूत विचार आहे.

शेतकरी हा केवळ एक व्यवसाय नसून देशाच्या अन्नसुरक्षेचा आधारस्तंभ आहे. मात्र आजही अनेक गावांमध्ये गटबाजी, राजकीय मतभेद आणि सामाजिक भेदभावामुळे विकासकामांना अडथळे निर्माण होतात. समाज एकत्र आला नाही, तर पाणी, शेती, रोजगार आणि पर्यावरण यांसारख्या मूलभूत प्रश्नांवर प्रभावी उपाय शोधणे कठीण होते. जलनायक मयंक गांधी यांनी ही वस्तुस्थिती ओळखली. त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, ‘‘एकटा शेतकरी संघर्ष करू शकतो, पण परिवर्तन घडवण्यासाठी समाजाची एकजूट आवश्यक असते.’’ म्हणूनच त्यांनी ‘‘मी शेतकरी’’ या विचाराला प्रत्यक्ष कृतीची जोड दिली. ७ नोव्हेंबर २०२५ रोजी सिरसाळा येथे देशाचे कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांच्या उपस्थितीत ग्लोबल विकास ट्रस्टच्या वतीने भव्य शेतकरी संवाद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या मेळाव्यात राज्यभरातून सुमारे ५० हजारांहून अधिक शेतकरी बांधव सहभागी झाले. एका आवाहनाला मिळालेला हा प्रतिसाद शेतकऱ्यांच्या एकजुटीची ताकद दर्शवणारा होता. शेतकऱ्यांचे प्रश्न, अडचणी आणि त्यांच्यासमोरील संकटे शासनापर्यंत पोहोचवून त्यावर प्रभावी उपाययोजना व्हाव्यात, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश होता. या मेळाव्यात विविध जाती, धर्म, राजकीय पक्ष, संघटना आणि विचारधारांतील लोक सहभागी झाले होते. मात्र त्यांची ओळख एकच होती - ‘‘मी शेतकरी’’. मागील अनेक वर्षांपासून ग्लोबल विकास ट्रस्ट जलनायक मयंक गांधी आणि संजय परमार यांच्या प्रेरणेतून महाराष्ट्र, गुजरात आणि मध्य प्रदेशमध्ये विविध विकासकामे राबवत आहे. या कामांदरम्यान शेतकऱ्यांच्या अडचणी आणि समस्यांचा सखोल अभ्यास करण्यात आला. अनेक समस्यांचे मूळ समाजातील विभागणी आणि एकीच्या अभावात असल्याचे दिसून आले. जोपर्यंत समाज एकत्र येत नाही, तोपर्यंत समृद्धीचा मार्ग सापडणार नाही, ही जाणीवच ‘‘मी शेतकरी’’ या संकल्पनेची प्रेरणा ठरली. ग्लोबल विकास ट्रस्टच्या माध्यमातून यावर्षी चार तालुक्यांतील ४१ गावांमध्ये नद्यांच्या पुनरुज्जीवनाचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबविण्यात आला. सुमारे १०८ किलोमीटर नदीपात्राचे रुंदीकरण आणि खोलीकरण पूर्ण झाले. ही केवळ यंत्रसामग्री किंवा निधीची ताकद नव्हती, तर समाजाच्या एकीचा विजय होता. प्रत्येक गावात वेगवेगळे राजकीय गट, सामाजिक मतभेद आणि वर्षानुवर्षे सुरू असलेले तणाव होते. मात्र ग्रामसभांच्या माध्यमातून लोकांना एकत्र आणण्यात आले. पाणीटंचाई, हवामान बदल आणि शेतीसमोरील वाढती आव्हाने यांची जाणीव करून देण्यात आली. भविष्यातील संकटांचा सामना करायचा असेल, तर सर्व भेद विसरून एकत्र येणे हाच एकमेव मार्ग असल्याचा संदेश देण्यात आला.

‘‘मी शेतकरी’’ या विचाराने अनेक गावांमध्ये नवी ओळख निर्माण केली. लोकांनी स्वतःला प्रथम शेतकरी आणि नंतर इतर कोणत्याही गटाचे सदस्य मानण्यास सुरुवात केली. या विचारातून सामूहिक श्रमदान, जलसंधारण आणि विकासकामांना नवी गती मिळाली. आज शेती क्षेत्र अनेक आव्हानांशी झुंज देत आहे. हवामान बदल, पाण्याची कमतरता, वाढता उत्पादन खर्च आणि बाजारातील अनिश्चितता यामुळे शेतकरी चिंतेत आहे. अशा परिस्थितीत गटशेती, सामूहिक नियोजन आणि शाश्वत शेती हाच पुढील मार्ग आहे. मात्र त्यासाठी सर्वप्रथम मनांचे एकत्रीकरण आवश्यक आहे. ‘‘मी शेतकरी’’ ही संकल्पना त्या एकीकरणाची सुरुवात आहे. ती समाजाला विभागणाऱ्या भिंती पाडून विकासाची नवी दारे उघडते. कारण कोणत्याही गावाचा, समाजाचा किंवा राष्ट्राचा खरा विकास हा एकी, विश्वास आणि सामूहिक प्रयत्नांतूनच घडत असतो. आज प्रत्येकाने स्वतःला एक प्रश्न विचारण्याची गरज आहे - ‘‘मी कोण?’’ जर उत्तर ‘‘मी शेतकरी’’ असेल, तर त्यात केवळ एक ओळख नाही, तर सामाजिक परिवर्तनाची आणि समृद्ध भवितव्याची ताकद दडलेली आहे.

## मंठ्यात वर्तमानपत्रामध्ये खाद्यपदार्थांची सर्रास विक्री

### अन्न व औषध प्रशासन विभागाचे अर्थपूर्ण दुर्लक्ष

मंठा। प्रतिनिधी

वर्तमानपत्राच्या पेपरवर खाद्यपदार्थ विकल्यास कारवाई करण्याचा इशारा अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी दिलेला असताना मंठा शहरात सर्रास वर्तमान पेपरवर वडापाव, सेव चिवडा, जिलेबी, भजे, खिचडी यासह विविध खाद्यपदार्थांची सर्रासपणे विक्री होत असताना जिल्ह्याचे अन्न व औषध प्रशासन विभाग अर्थपूर्ण दुर्लक्ष करीत असल्याचे दिसून येते. मंठा शहरातील अनेक हॉटेल व दुकानांवर अनेक दिवसापूर्वी पॅकिंग केलेले व कालबाह्य तारखेचे

खाद्यपदार्थ विक्री केले जातात. त्यामुळे नागरिकांचे आरोग्य बिघडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. सध्या शहरातील अनेक हॉटेलमध्ये वर्तमानपत्रांमध्ये खाद्यपदार्थ विक्री केले जातात अशी नागरिकांची ओरड असून अन्न व औषध प्रशासनाने लक्ष देण्याची गरज आहे. जिल्ह्याचे सहाय्यक आयुक्त श्री कुलकर्णी व निरीक्षक अश्विनी तांबे यांचे दुर्लक्ष होताना दिसून येत आहे. मंठा शहरातील कोणकोणत्या हॉटेलमध्ये वर्तमानपत्रांमध्ये खाद्यपदार्थ दिले जातात याची शहानिशा करून कारवाई करण्याची मागणी करण्यात येत आहे.



cmyk

दैनिक
राज्य लोकतंत्र


# बिंदुसरा नदी पात्रात अतिक्रमणाचा तर पुरेषेच्या हद्दीत अनाधिकृत बांधकामाचा विळखा

## उच्चस्तरीय चौकशीची मागणी; नगर पालिकेकडून नियम व अटीची केली जाते माती

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील बिंदुसरा नदी पात्र, पूरप्रवण क्षेत्र तसेच रेड फ्लड लाईन व ब्ल्यू फ्लड लाईन परिसरात झालेल्या बांधकामांची, नदीपात्रातील भरावांची तसेच उभारण्यात आलेल्या संरक्षण भिंतींची उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकारी बीड यांच्यासह संबंधित विभागांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, बिंदुसरा नदी पात्रालगत मागील काही वर्षांमध्ये मोठ्या प्रमाणावर निवासी, व्यावसायिक व बहुमजली बांधकामे उभारण्यात आली आहेत. या बांधकामांना परवानग्या देताना लागू असलेले कायदे, विकास नियंत्रण नियम, पूररेषा निर्बंध, जलसंपदा विभागाची आवश्यक मंजुरी तसेच इतर विभागीय परवानग्यांचे पालन करण्यात आले आहे किंवा नाही, याबाबत गंभीर शंका निर्माण झालेली आहे.सामाजिक कार्यकर्त्यांनी असा आरोप केला आहे की, बिंदुसरा नदी पात्र, पूरप्रवण क्षेत्र तसेच रेड फ्लड लाईन व ब्ल्यू फ्लड लाईन परिसरातील बांधकामांबाबत गेल्या अनेक वर्षांपासून नागरिक, सामाजिक संघटना व विविध सामाजिक चळवळींकडून सातत्याने आंदोलने, निवेदने, तक्रारी व पाठपुरावा करण्यात आलेला आहे. मात्र या गंभीर बाबींची अपेक्षित दखल संबंधित प्रशासनाने



घेतलेली नसल्यामुळे नियमबाह्य बांधकामांना अप्रत्यक्षपणे प्रोत्साहन मिळाल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे.

निवेदनात पुढे म्हटले आहे की, नदी पात्राला स्वतंत्र सर्व्हे क्रमांक नसला तरी नदीलगतचे अनेक सर्व्हे क्रमांक, गट क्रमांक व मालमत्ता पूररेषा क्षेत्रात येत असण्याची शक्यता आहे. त्यामुळे संबंधित बांधकामे अधिकृत रेड फ्लड लाईन अथवा ब्ल्यू फ्लड लाईन क्षेत्रामध्ये येतात किंवा नाहीत याची सक्षम तांत्रिक यंत्रणेमार्फत प्रत्यक्ष पडताळणी करण्यात यावी.यासोबतच सावता माळी चौक परिसराकडील बिंदुसरा नदीपात्रामध्ये मोठ्या प्रमाणावर भराव टाकण्यात येत असल्याचा तसेच नदीच्या एका बाजूस संरक्षण भिंती उभारण्यात येत असल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. या भराव व संरक्षण भिंतींमुळे नदीपात्राची मूळ रुंदी कमी होत असल्याचा दावा करण्यात आला असून त्यामुळे नदीच्या नैसर्गिक प्रवाहावर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.कार्यकर्त्यांच्या म्हणण्यानुसार, नदीपात्र अरुंद झाल्यास पूरकाळात पाण्याचा दाब व प्रवाह दिशा बदलून नदीच्या विरुद्ध बाजूस असलेल्या भागांवर अतिरिक्त पूरदाब निर्माण होऊ शकतो. परिणामी भविष्यात अलीकडील वसाहती, व्यापारी भाग, घरे तसेच सार्वजनिक मालमत्तांना पूराचा धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे या सर्व कामांचे जलसंपदा विभागामार्फत तांत्रिक परीक्षण करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे.निवेदनात काही भूमाफिया, विकासक, बांधकाम व्यावसायिक व संबंधित विभागांतील अधिकारी यांच्यामध्ये साखळी पद्धतीने कार्यरत असलेली यंत्रणा अथवा संगनमत असण्याची शक्यता नाकारता येत नसल्याची ◀◀ पान ३ वर

# डीएचओ साहेब आरोग्य सुविधांकडे लक्ष द्या

## चकलांबा आरोग्य उपचाराअभावी रुग्णांना ताटकळत बसावे लागते

**बीड । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील चकलांबा हे गाव बीडपासून पश्चिमेस लांब असल्याने येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील आरोग्य सुविधांकडे दुर्लक्ष झाले आहे. या आरोग्य केंद्रातील अधिकारी आणि कर्मचारी मनमानी वागत असल्याची तक्रार करण्यात आली आहे.




चकलांबा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दोन वैद्यकीय अधिकाऱ्याची मंजूर पदे आहेत. मात्र वर्षभरापासून येथे कायमस्वरूपी वैद्यकीय अधिकारी नाही. तर कर्मचाऱ्याची रिक्त पदे आहेत. या आरोग्य केंद्रात तात्पुरत्या डॉक्टर'ची नियुक्ती करण्यात आली आहे. गुरूवार दि.११ रोजी डॉक्टर अभावी रुग्णांना ताटकळत बसण्याची वेळ आली. जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी दखल घेऊन कायमस्वरुपी वैद्यकीय अधिकारी नियुक्त करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. गेवराई तालुक्यातील चकलांबा येथील प्राथमिक आरोग्य केंद्र हे वाऱ्यावर असून या ठिकाणी पदाचा पदाचा अधिकृत वैद्यकीय अधिकारी नाही. कंत्राटी पद्धतीने असलेल्या सीएचओ रुग्ण तपासणी करत आहेत.चकलांबा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील काही कर्मचारी ही कधीच वेळेवर येत नाहीत. पदाचे कायम वैद्यकीय अधिकारी नसल्यामुळे खालचे कर्मचारी उशिराने रुग्णालयात येतात. कर्मचारी उपस्थित नसल्यामुळे अनेक रुग्णांना उपचार अभावी ताटकळत बसावे लागते.

# केदारेश्वर कारखान्याने माजलगावच्या शेतकऱ्यांचे सहा महिण्यांपासुन थकविले पैसे

## चेअरमन प्रताप ढाकणे यांच्या घरावर मोर्चा काढणार- युवा शेतकरी संघर्ष समितीचा ईशारा

माजलगाव । प्रतिनिधी

अहमदनगर जिल्ह्यातील श्री. केदारेश्वर सहकारी साखर कारखान्याने शहरासह तालुका परिसरातील अनेक उस उत्पादक शेतक-यांचे मागील सहा महिण्यांपासुन उस बिलाचे पैसे थकविले असुन कारखाना प्रशासन फक्त वेळकाढु धोरण अवलंबवीत असल्याने मात्र शेतकरी आर्थिक अडचणीत आला त्यामुळे या प्रकरणी कारखान्याचे चेअरमन प्रताप ढाकणे यांच्या घरावर मोर्चा काढण्याचा ईशारा युवा शेतकरी संघर्ष समितीने देत आक्रमक पावित्रा घेतला आहे.

श्री. केदारेश्वर सहकारी साखर कारखान्याने माजलगाव तालुक्यातील टाकरवण, तालखेड, किट्टी आडगाव, माजलगाव शहर व परिसरातील बहुतांशी शेतक-यांचा उस गाळपास नेला परंतु सहा महिण्यांपासुन एक रूपयाही संबंधित शेतक-यांना दिला नाही. त्यामुळे वरील सर्कलमधील व उस दिलेले शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. खरिपाच्या पेरणीला तरी पैसे मिळतील असे वाटत होते परंतु कारखान्याचे चेअरमन व एमडी रमेश गरजे हे पैसे देण्यास टाळाटाळ व विलंब करत आहेत. त्यामुळे शेतकरी अडचणीत आला आहे. त्यामुळे केदारेश्वर कारखाना चेअरमन व प्रशासनाने माजलगावकरांचा अंत पाहु नये, शेतक-यांचा संयम सुटला असुन पेरणीला पैसे नसल्याने शेतक-यांना खासगी बँक व सावकराच्या दारात जाण्याची वेळ आली आहे. त्यामुळे युवा शेतकरी संघर्ष समिती लवकरच थकीत बिलाबाबत सर्व शेतक-यांची बैठक घेवुन ठोस पाउले उलणार असुन कारखान्याचे चेअरमन ॲड. प्रताप बबनराव ढाकणे यांच्या घरावर शेतक-यांसह मोर्चा काढण्यात येणार असल्याचे युवा शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने कळविण्यात आले आहे.

# तुकाराम मुंढेची धास्ती, जिल्ह्यातील अनेक नामांकित हॉटेलची शटर बंद

बीड । प्रतिनिधी

अन्न औषध प्रशासन विभागाचा पदभार घेतल्यानंतर आयुक्त तुकाराम मुंढे यांनी राज्यभर चांगला धडाका लावला आहे अन्नामध्ये भेसळ करून विक्री करणारे गुटखा माफिया इतर हॉटेल व्यवसाय यांच्यावर कारवाई सुरू केल्याने चांगलीच खळबळ उडाली असून बीड जिल्ह्यातील अनेक नामांकित हॉटेल बंद असल्याचे दिसत आहे जे हॉटेल्स बंद आहेत ते ग्राहकांना काहीतरी भेसळयुक्त देत होते असा आता प्रश्न उपस्थित केला जात आहे.

आय ए एस अधिकारी तुकाराम मुंढे तसे नाव नवीन आहे राज्याला पूर्ण माहित आहे त्यांच्या शासकीय सेवेचा कार्यकाळ आहे तेवढ्या वेळी त्यांच्या बदल्या झालेल्या आहेत त्या बदल्या राजकीयकारणानेच झाल्याचे दिसते मात्र तुकाराम मुंढे यांनी कोणत्याही विभागात आपली बदली हो तेथे शिस्त आणि प्रामाणिकपणा आणि ताक निर्माण केला आता नुकतीच त्यांची अन्न व औषध प्रशासन विभागाचे प्रमुख म्हणून बदली झाल्यानंतर त्यांनी राज्यात अनेक ठिकाणी छापे मारले दूध भेसळ अन्नामध्ये भेसळ गुटखा विक्री यासोबतच बनावट खावा बनावट औषधे यांच्यावर धाडसत्र सुरू केल्या याशिवाय हॉटेलमधून ◀◀ पान ३ वर

# 'दारुल उलुम मदरसा' संस्थेच्या आर्थिक व्यवहारांची व घोटाळ्याची चौकशी करा

बीड । प्रतिनिधी

येथील तेलगाव नाका परिसरातील सर्व्हे नं. ३२ मध्ये असलेल्या 'दारुल उलुम मदरसा बीड एफ १९२' या संस्थेच्या आर्थिक व्यवहारांची, देश-विदेशातून मिळणाऱ्या देणग्यांची आणि शासनाचा जीएसटी बुडविल्याप्रकरणी सखोल चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करणारे पत्र मुख्यमंत्री, धर्मादाय आयुक्त व इतर संबंधित विभागांना देण्यात आले आहे. 'दर्गाह हजरत मन्सूरशाह वली (रह.) बीड' या संस्थेचे निवेदक गुलदाद गफ्फारखॉन पठाण यांनी हे पत्र दिले आहे.

बेकायदेशीर इमारत बांधकाम: तेलगाव नाका परिसरातील सदर मदरसाची इमारत ही कोणत्याही अधिकृत बांधकाम परवान्याशिवाय (तालेगंज इमारत) बांधण्यात आली असल्याचे बोलले जाते.

४०० विद्यार्थ्यांच्या मोफत निवासाचा आणि खर्चाचा संशय: मदरसाचे अध्यक्ष इकबाल कुरेशी यांनी महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरण औरंगाबाद येथे दाखल याचिकेत ४०० विद्यार्थ्यांना मोफत निवास व जेवण दिले जात असल्याचे म्हटले आहे. मात्र, दरवर्षी या विद्यार्थ्यांसाठी येणारा एवढा मोठा खर्च नेमका कुठून येतो? याचा कोणताही स्पष्ट हिशोब दिलेला नाही.

५१ कर्मचाऱ्यांच्या पगाराचे गूढ: ४०० विद्यार्थ्यांसाठी केवळ १० ते १५ कर्मचाऱ्यांची आवश्यकता असताना ५१ कर्मचारी कशासाठी भरले? तसेच या कर्मचाऱ्यांचा पगार बँकेतून दिला जातो की रोख स्वरूपात? आणि या खर्चावर शासनाचा जीएसटी भरला गेला का? असे अनेक प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत.

जमीन उत्पन्नाची लपवाछपवी: गेल्या ४९ वर्षांपासून बीड येथील 'नागापूर खुर्द' येथील जमीन कराराने घेण्यात आली आहे. या जमिनीतून मिळणारे उत्पन्न कुठे गेले आणि दरवर्षी किती पैसा जमा झाला, याची कोणतीही माहिती उघड केलेली नाही. केवळ इमारत आणि कर्मचाऱ्यांवर खर्च दाखवून ऑडिटमध्ये नोंद केली जात असल्याचा संशय आहे.ऑडिटमधील संशयास्पद बाबी: संस्थेने २०१३ ते २०२२ या १० वर्षांचे ऑडिट एकाच वेळी केले आहे, तर २०१० ते २०२५ (१५ वर्षे) चे जे ऑडिट केले गेले त्यामध्ये धर्मादाय उपायुक्तांची दिशाभूल करण्यात आली आहे. या ऑडिटमध्ये देश-विदेशातून आलेल्या देणग्या व नागापूर खुर्द येथील जमिनीच्या उत्पन्नाची नोंद केलेली नाही.

ईदगाह मैदानावरील वर्गणीची नोंद नाही: गेल्या ५० वर्षांपासून बीडच्या जुन्या ईदगाह मैदानात रमजान आणि बकरी ईदच्या नमाजासाठी येणाऱ्या समाजबांधवांकडून पिशवी फिरवून लाखो रुपये जमा केले जातात. या जमा रक्कमेची कोणतीही नोंद ऑडिट रिपोर्टमध्ये नाही.

पावसाळी अधिवेशनात मुद्दा मांडणार

संस्थेला दरवर्षी कोट्यवधी रुपयांची देणगी मिळत असूनही त्याचा हिशोब मागण्याची कोणाची हिंमत होत नाही. संस्थेचे अध्यक्ष व सचिव लोकांच्या धार्मिक भावनांचा गैरफायदा घेत ◀◀ पान ३ वर

# मोठेवाडीत सरकारविरोधात एल्गार

# कर्जमाफी निर्णयाची प्रतीकात्मक होळी

माजलगांव । प्रतिनिधी

तालुक्यातील मोठेवाडी येथे शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने दि १२ जुन शुक्रवार रोजी शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी भव्य रॅली काढून शासनाविरोधात तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला. यावेळी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ अंतर्गत जाहीर करण्यात आलेल्या कर्जमाफीच्या शासन निर्णयाची प्रतीकात्मक होळी करण्यात आली.



या आंदोलनात शेतकऱ्यांनी शासनाच्या धोरणांविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. शासनाने जाहीर केलेल्या कर्जमाफी योजनेत यापूर्वी छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना तसेच महात्मा ज्योतिबा फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांना नव्या योजनेतून वगळण्यात आले आहे.त्यामुळे राज्यातील मोठ्या संख्येने शेतकरी कर्जमाफीपासून वंचित राहणार असल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. शेतकरी संघर्ष समितीचे नेते भाई गंगाभीषण थावरे यांनी सांगितले की, निवडणुकांपूर्वी शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करण्याचे आश्वासन देण्यात आले होते.त्यामुळे नव्या सरकारकडून शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळेल, अशी अपेक्षा होती. मात्र जाहीर करण्यात आलेली कर्जमाफी योजना शेतकऱ्यांच्या अपेक्षाभंग करणारी असून अनेक पात्र शेतकरी लाभापासून वंचित राहणार आहेत. त्यामुळे ही योजना शेतकऱ्यांच्या हातात गाजर दाखविणारी ठरत असल्याची भावना शेतकरी व्यक्त करीत आहेत.

याशिवाय, २०२५ मध्ये बीड जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले होते. त्यावेळी मुख्यमंत्री यांनी जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांना सरसकट पीकविमा देण्याची घोषणा केली होती. मात्र अद्याप त्या घोषणेची ◀◀ पान ३ वर

# धर्मापुरीत 'एलसीबी'चा मोठा छापा; पावणेदहा लाखांचा गांजा जप्त, दोघे अटक

बीड / परळी । प्रतिनिधी

परळी ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील धर्मापुरी येथे स्थानिक गुन्हे शाखेने (डउइ) एका घराबाहेर व घरात चालणाऱ्या गांजा विक्रीच्या अड्ड्यावर धडक छापा टाकला. या कारवाईत पोलिसांनी तब्बल २० किलो ३४० ग्रॅम वजनाचा गांजा आणि इलेक्ट्रॉनिक वजनकाटा असा एकूण ९ लाख ७७ हजार ३२० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी दोघांविरुद्ध परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गोपनीय बातमीदाराकडून मिळाली होती माहिती

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी बंटेवाड यांना गोपनीय बातमीदाराकडून खात्रीशीर माहिती मिळाली होती की, धर्मापुरी (ता. परळी, जि. बीड) येथील रहिवासी बाबूलाल उर्फ बबलू आतार हा आपल्या राहत्या घरातून गांजाची बेकायदेशीर व चोरटी विक्री करत आहे. माहिती मिळताच पोलीस निरीक्षकांनी तात्काळ वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना याबाबत अवगत केले.

महसूल अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत धाडसी कारवाई

वरिष्ठांच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे सहायक पोलीस निरीक्षक (सपोनि) धनराज जारवाल यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांचे पथक आणि महसूल विभागाचे सक्षम अधिकारी, तहसील कार्यालय परळीच्या मंडळ अधिकारी श्रीमती पल्लेवाड मॅडम तसेच धर्मापुरी सज्जाचे तलाठी श्री. यासेर शेख यांना सोबत घेऊन ◀◀ पान ३ वर




# बीबीएफ यंत्राद्वारे पेरणी केल्यास उत्पादन वाढीस मदत; शेतकऱ्यांनी बीबीएफने पेरणी करावी - विजयकुमार पवार

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई तालुक्यातील शेतकऱ्यांनी खरीप हंगामातील पेरणी करताना बीबीएफ यंत्राचा वापर करावा, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी विजयकुमार पवार यांनी केले आहे. बदलत्या हवामान परिस्थितीचा विचार करता आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून शेती करणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.



सध्या खरीप हंगामाची तयारी सुरू असून अनेक भागांत पावसाने हजेरी लावली आहे. मात्र, केवळ पाऊस पडल्यामुळे घाईघाईने पेरणी न करता शेतामध्ये पेरणीयोग्य ओलावा निर्माण झाल्यानंतरच पेरणी करावी, असा सल्लाही कृषी विभागाने शेतकऱ्यांना दिला आहे. योग्य ओलावा नसताना केलेली पेरणी उगवण कमी होण्यास कारणीभूत ठरू शकते, असेही पवार यांनी नमूद केले. बीबीएफ पद्धतीमध्ये शेतात उंच वाफे आणि सऱ्या तयार करून पेरणी केली जाते. त्यामुळे पावसाचे अतिरिक्त पाणी सऱ्यांमधून सहज निघून जाते. परिणामी पाणथळ परिस्थिती निर्माण होत नाही आणि पिकांच्या मुळांना आवश्यक हवा व ओलावा मिळत राहतो. विशेषतः सोयाबीन, तूर, मूग, उडीद यांसारख्या पिकांसाठी ही पद्धत अत्यंत उपयुक्त ठरत असल्याचे कृषी तज्ज्ञांचे मत आहे. तालुका कृषी अधिकारी विजयकुमार पवार यांनी सांगितले की, बीबीएफ पद्धतीचा अवलंब केल्यास पिकांची उगवण एकसारखी होते. पावसाच्या पाण्याचा योग्य निचरा झाल्यामुळे अतिवृष्टीच्या काळात पिकांचे नुकसान कमी होते. तसेच जमिनीतील ओलावा संतुलित राहिल्यामुळे पिकांची वाढ चांगली होते आणि उत्पादन वाढीस मदत मिळते. याशिवाय या पद्धतीमध्ये तण नियंत्रण करणे सोपे जाते. आंतरमशागत व इतर कृषी कामे सुलभपणे करता येतात. त्यामुळे मजुरी खर्चात बचत होऊन शेती अधिक ◀◀ पान ३ वर

# नवीन मीटरने ग्राहकांचे कंबरडे मोडले



**बीड । प्रतिनिधी**

वीज वितरण कंपनीकडून ग्राहकांना नवीन मीटर देण्यात येत असून हे मीटर बसवल्यापासून ग्राहकांना दीडपट बिल येत आहे. मागच्या महिन्यात जर एखाद्याला एक हजार रुपये बिल येत असेल तर आता दीड हजार ते सोळाशे रुपये बिल येत आहे. वीज वितरण कंपनीकडून ही लूट मोठ्या प्रमाणात चालू असून ग्राहकाचा असंतोष वाढत आहे. वीज चोरी आणि वीज गळती याचा अधिभार बिल भरणाऱ्या ग्राहकांना लावला जात आहे काय? अशी शंका ही व्यक्त केली जात आहे. काही ग्राहकांना तर जवळपास दुप्पट बिल येत असून या प्रकारामुळे ग्राहक वैतागून गेले आहेत.

### वीज वितरण कंपनी आकारते दीडपट विज बिल

गेल्या काही दिवसापासून वीज वितरण कंपनीची मनमानी चालू असून कंपनीच्या ठेकेदारांना कोट्यावधी रुपयांचा मलीचा दिला जात आहे. मात्र याची वसुली ग्राहकांकडून केली जात आहे. बोगस ट्रान्सफॉर्मर बोगस साहित्य पुरवठा करून गुत्तेदार आणि अधिकारी कोट्यावधी रुपयांची कमाई करत असून ट्रांसफार्मर मध्ये मोठ्या प्रमाणात लूट चालू आहे. कॉपर वायरच्या ट्रांसफार्मर चे बिल वसूल करून त्या बदल्यात ॲल्युमिनियम वायरचे ट्रांसफार्मर पुरवठा केले जात आहे. हा प्रकार गंभीर असून यावर अधिकारीही काही बोलत नाहीत. नेमके ठेकेदारांना अधिकारी का वाचवत आहेत याचे गोड बंगाल कळत नाही. पूर्वीचे मीटर व्यवस्थित असतांनाही आता कोणाच्या तरी घशात लाखो रुपये घालण्यासाठी नवीन मीटर ग्राहकांना दिले जात आहे. हे मीटर पूर्वीपेक्षा दुप्पट बिल देत असून ग्राहकांची मोठ्या प्रमाणात लूट चालू आहे. यामुळे ग्राहकांमध्ये असंतोष वाढत असून वीज गळती आणि वीज चोरी चा अधिकार बिल भरणाऱ्या ग्राहकांच्या खांद्यावर टाकला जात आहे काय? अशी शंकाही उत्पन्न होत आहे. नवीन मीटर सुरू झाल्यापासून ग्राहक वीज बिलाला वैतागले असून हे नवीन मीटर कोणाच्या फायद्यासाठी बसवले जात आहेत? याचा खुलासाही अधिकाऱ्यांनी केला पाहिजे अशी मागणी ही ग्राहक करत आहेत.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26